संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा



Hero GIFT Grand Indian Festival of Trust

तडजोड नाही, फक्त नवीन HF-Deluxe

फेस्टिव्ह एक्स शोरूम किंमत* ₹69,868* ₹64,868* (₹4000* कॅश डिस्काउंट सोबत)

कमी डाउन पेमेंट ₹1999* | EMI ₹3999* | व्याजदर 5.99%* | निवडक काईसवर कॅशबॅक ₹5000* | 98980 51581



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. १७.१०.२०२४ | अंक नं. १९३ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020



यंदा दिवाळी राजपाल सोबत
खरेदी मस्त..बक्षिसे जबरदस्त!
खरेदी करा आणि जिंका 31 दिवस 21 लाखांची बक्षिसे
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

उपवासाच्या सर्व प्रकारच्या पदार्थांसाठी ग्राहकांची प्रथम पसंती...
सर्वोत्कृष्ट प्रतिचा, स्वच्छ व चविष्ट
राजमोती साबुदाना
सर्वत्र उपलब्ध
1 Kg | 500 gm | 250 gm • इन्स्टंट साबुदाना सुद्धा उपलब्ध !

Sintex PVC DOORS
Ideal for Bathroom Toilet & Kitchen
BHINGARWALA ENTERPRISES
Near Swastik Chowk, Station Road, Ahmednagar. Mob 9422224990

EARTH's Green Library Greenery for Every Space
Indoor Plants for your Home!
Get a Plant Today!
Amit Sanklecha 99231 43334
Website : greenlibrary.in

मन प्रसन्नता.. एकाग्रता शांतीसाठी
एक अगरबत्तीचा सुवास दरवळेल दूरवर...
मोमेंटस् अगरबत्ती
केवळ अगरबत्ती

आला आला पाऊस आला..
रेनकोट / 2 in1 जर्किन
लहान मुलांपासून सर्वांसाठी
Branded Zeel/Boss/Only One Complete Range..!
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अहमदनगर.
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505


# सणासुदीच्या काळात विजेचा लपंडाव सुरूच

## बाजारपेठेतील वीज तासन्तास खंडीत, व्यापारी, व्यावसायिकांसह नागरिकही त्रस्त

नगर - दिवाळी सण तोंडावर आला असल्याने सध्या शहरातील बाजारपेठेत खरेदीसाठी गर्दी वाढत आहे. सणांमुळे व्यापार, व्यवसायांनी गती घेतली आहे. अशा सणासुदीच्या काळात शहरात विजेचा लपंडाव पुन्हा सुरू झाला असून, दिवसभरात आणि रात्रीच्या वेळीही तासन्तास वीजपुरवठा खंडीत केला जात आहे. त्यामुळे बाजारपेठेतील व्यापारी, व्यवसायिकांसह खरेदीसाठी आलेल्या नागरिकांनाही अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

महावितरण कंपनीकडून विजेचे कोणतेही भारनियमन केले जात नसल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केलेले आहे. तथापि मागील काही दिवसांपासून शहर आणि परिसरात अचानक वीजपुरवठा खंडीत होण्याचे प्रकार सुरू आहेत. दसऱ्यानंतर बाजारपेठेतील वर्दळ वाढली आहे. दिवाळी सणाच्या खरेदीला सुरुवात झाली आहे. त्यामुळे व्यापारी, व्यवसायिकांच्या दुकानात गर्दी वाढत आहे. अशातच महावितरण कंपनीकडून वीजपुरवठा वारंवार खंडीत केला जात आहे. वीजपुरवठा खंडीत करण्यापूर्वी व्यवसायिकांसह नागरिकांना कंपनीकडून कोणतीही पूर्वकल्पना दिली जात नाही. बाजारपेठेसह शहराच्या विविध भागातील वीजपुरवठा अचानक खंडीत केला जातो. दिवसभर विजेचा लपंडाव सुरूच राहतो. दिवसाबरोबरच रात्रीच्यावेळीही तासन्तास वीजपुरवठा खंडीत केला जात असल्याने अंधाराचा सामना करावा लागतो. मंगळवारी (दि. १५) रात्री सावेडी-बालिकाश्रम रोड परिसरातील वीजपुरवठा तब्बल ४ तासाहून जास्त वेळ खंडीत झाला होता. त्यामुळे नागरिकांना त्याचा प्रचंड त्रास सहन करावा लागला. रात्रीच्यावेळी वीज गेल्यानंतर व्यापारी, व्यवसायिकांसह नागरिकांना अनेक समस्या भेडसावतात. त्यांच्या व्यवसायावर विपरित परिणाम होत आहे. सणासुदीच्या दिवसांमुळे अंधारात चोरी, लुटमारीसह गुन्हेगारी घटना घडण्याची भीती असते. वीज गेल्यानंतर व्यापारी, व्यवसायिकांना दुकाने बंद करून रात्रीच्या अंधारात घरी जाताना भीतीदायक वातावरण असते. त्याचबरोबर सध्या ऑक्टोबर हिट वाढलेली आहे. फॅन, कुलरचा वापर वाढला आहे. मात्र विजेच्या लपंडावामुळे नागरिकांना घामाघूम व्हावे लागत आहे.

महावितरण कंपनीने सणासुदीच्या काळात सुरू असलेला विजेचा खेळखंडोबा तात्काळ थांबवावा तसेच व्यापारी, व्यावसायिक आणि नागरिकांची विजेच्या समस्येतून सुटका करावी, अशी मागणी होत आहे.

# खाजगी वाहनांवर पक्षाचे बोधचिन्ह लावण्यास निर्बंध

नगर - भारत निवडणूक आयोगाने सार्वत्रिक विधानसभा निवडणूकीचा कार्यक्रम घोषित केला असल्याने जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी निवडणूक कालावधीत खाजगी वाहनावर सक्षम प्राधिकारणाच्या पूर्वपरवानगीशिवाय पक्षाचे बोधचिन्ह लावण्यास निर्बंधाचे आदेश निर्गमित केले आहेत.

जिल्ह्यात सक्षम प्राधिकरणाच्या पूर्वपरवानगी शिवाय ऑटोरिक्षा, टेम्पो, मोटार सायकल व इतर खाजगी वाहनांवर पक्षाचे बोधचिन्ह, झेंडे व इतर घोषवाक्य लिहीणे इत्यादींवर या आदेशान्वये निर्बंध घालण्यात आले आहेत. आदेशाचा भंग करण्याऱ्यांविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३ प्रमाणे कारवाई केली जाईल, तसेच हे आदेश २५ नोव्हेंबर पर्यंत जिल्ह्यात लागू राहतील, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.


•।। चौथे श्रध्दासुमन ।।•



स्व. संजयकुमार कचरदासजी छाजेड
स्व. दि. १८/१०/२०२०
साथ सुटली लाख मोलाची
छाया विरली, आपल्या मायेची...
ज्योत विझली आशेची
*आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण सुमनांजली..*
शोकाकुल
श्रीमती स्नेहल । चि. निर्मल
श्री. दर्शन व सौ. प्रतिक्षा दर्शन छाजेड
श्री राजकुमार । अशोककुमार । डॉ. ईश्वरकुमार । किशोरकुमार । मनोजकुमार
छाजेड परिवार अहिल्यानगर-पुणे-अहमदाबाद
श्री आनंदकुमारजी कांतीलालजी खिंवसरा व परिवार-सिन्नर (नासिक)
श्री संतोषकुमारजी शुभमकुमारजी दुधेडिया व परिवार-हडपसर (पुणे)

CREDAI AHILYANAGAR
पुर्ण करा आपल्या वास्तुचे स्वप्न!!
CREDAI AHILYANAGAR Mega Property EXPO 2024
with home bring happiness..
TITLE SPONSOR - SBI
शुक्र | शनि | रवि
१८ | १९ | २०
ऑक्टोबर
स्थळ:
सारडा कॉलेज ग्राउंड, पत्रकार चौक, सावेडी, अहिल्यानगर
PLATINUM SPONSOR | GOLD SPONSOR | SILVER SPONSOR | RADIO PARTNER | FOOD PARTNER | CREATIVE PARTNER

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## स्वातंत्र्यानंतरचे परराष्ट्र धोरण

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१

गेल्या ७०–७५ वर्षात राबवलेल्या परराष्ट्र धोरणांतून आपल्या गाठी खूप अनुभव जमा झालेला आहे. त्या अनुभवांचा विशेषतः भविष्यकाळातील आव्हानात्मक मार्गाचा अत्यंत काळजीपूर्वक व खोलवर विचार करतांना नक्कीच फायदा होतो. इतक्या वर्षांचा विस्तृत कालावधी व परराष्ट्र धोरणाच्या परिणामांच्या व्याप्तीचा तयार केलेला वर्णपट फार मोठा आहे.

भावनाप्रधानतेला थारा न देता आपल्या कामगिरीचे मोजमाप केले तर लक्षात येते की, आपल्या काही प्रतिस्पर्ध्यांनी आपल्यापेक्षा सरस कामगिरी केली असली तरी आपलेही कर्तृत्व फारसे वाईट नाही म्हणता येईल.

अनेक आव्हानांना यशस्वीपणे तोंड देऊन आपण एकता, अखंडता निर्माण करून टिकवू शकलो. कालांतराने औद्योगिक क्षमता असलेली आधुनिक अर्थव्यवस्था (जी सध्या जगात ५ व्या क्रमांकावर आहे) विकसित केली गेली. निसर्गाच्या लहरीवरील शेतीचे प्रमाण घटवून संरक्षणात स्वयंभू होण्याच्या पथावर आहोत.



सर्वात महत्त्वाचे यश म्हणजे विविध उपकरणे, तंत्रज्ञानाचे स्त्रोत (फिनटेक) उपलब्ध करण्यात सुलभता आणली आहे. पण आजही आपल्या देशाच्या अनेक सीमारेषांवर अजूनही अशांतता आहे.

परकीय शक्तींच्या नादी लागून काही स्वार्थी, देशविरोधी तत्त्वे देशांतर्गत अशांतता करण्याचा प्रयत्न करीत आहेत.





अहिल्यानगरचा शाश्वत विकास व्हावा यासाठी आर्किटेक इंजिनिअर व सर्वेअर्स असोसिएशन मधील सभासदांनी एकत्र येवून नुकतीच बैठक घेऊन अहिल्यानगर विकास मंचची (फोरम) स्थापना करण्यात आली. (छाया – लहू दळवी)

# शहराच्या शाश्वत विकासासाठी अहिल्यानगर विकास मंच स्थापन

नगर – अहिल्यानगरचा शाश्वत विकास व्हावा यासाठी आर्किटेक इंजिनिअर व सर्वेअर्स असोसिएशन मधील सभासद तसेच शहरातील प्रतिष्ठित व्यक्ती एकत्र येऊन १५ ऑक्टोबर रोजी JLP टॉवर्स लिंक रोड केडगाव येथे बैठक घेऊन अहिल्यानगर विकास मंचची (फोरम) स्थापना करण्यात आली.

सदर मंच मार्फत शहरातील विकास कामांची तपासणी करून त्याचे अहवाल न्यूज पेपर ला प्रसिद्ध करणे तसेच संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवणे याद्वारे विकास कामे चांगले होण्यासाठी प्रयत्न करणे. नवीन होऊ घातलेल्या डेव्हलपमेंट प्लॅन चा अभ्यास करून त्यात आवश्यकतेनुसार बदल सुचवने. नगर शहर इतर शहरांची कनेक्टिव्हिटीचा अभ्यास करून प्रोजेक्ट रिपोर्ट शासकीय अधिकारी अथवा लोकप्रतिनिधी यांना सादर करून त्याचा पाठपुरावा करणे. शहराच्या पर्यटन वाढीसाठी उपाय सुचवणे व ते शासकीय अथवा लोकप्रतिनिधींकडे सादर करून शहराच्या पर्यटन विकासाला चालना देणे. शहरवासीयांच्या आर्थिक प्रगतीसाठी उपाययोजनांचा अभ्यास करून त्या शासकीय व लोकप्रतिनिधी यांचे कडे सादर करून पाठपुरावा करणे. सीना नदी विकास प्रकल्प चा अभ्यास करून डेव्हलपमेंट सादर करणे त्याचा पाठपुरावा करणे.

अहिल्या नगर विकास मंच
स्वच्छ,शिस्तबद्ध, विकसित शहर

पालिकेच्या पिंपळगाव माळवी येथील तलाव व शासकीय जागेत पर्यटन क्षेत्र तयार करण्यासाठी अभ्यास पूर्वक प्रोजेक्ट रिपोर्ट सादर करून त्याचा पाठपुरावा करणे. शहरातच असलेल्या भुईकोट किल्ल्याचा विकास व पर्यटन वाढीसाठी चालना देणे. शहरातील इंडस्ट्री ची वाढ होण्यासाठी प्रयत्न करणे. शहरात एज्युकेशन हब तसेच मेडिकल कॉलेज होण्यासाठी प्रयत्न करणे.

हॉकर्स झोनचे कायदे अभ्यासून त्यात सुधारणा करणे व त्या कायद्याची कठोर अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासनास भाग पाडणे. रस्त्यांची दुरावस्था तसेच रस्त्यातील पार्किंग, इमारती अतिक्रमण विक्रेता अतिक्रमण हे प्रशासनाच्या नजरेस आणून त्यावर कारवाई करण्यास भाग पाडणे. शहरात चालू असलेल्या विकास कामांचे ऑडिट करून तसेच ते संबंधित लोकप्रतिनिधी यांना भेटून पाठपुरावा करणे. मीटिंगमध्ये वरील प्रमाणे ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

संबंधित मंच हा आर्किटेक्ट इंजिनिअर व सर्वेअर्स असोसिएशनचा एक उपक्रम असून त्यात शहरातील प्रतिष्ठित नागरिक, सेवानिवृत्त अधिकारी, उद्योजक यांना विशेष निमंत्रित म्हणून जोडले जाईल असे मंचाचे आमंत्रक विजयकुमार पादीर यांनी सांगितले.

सभेस एसाचे अध्यक्ष आदिनाथ दहिफळे, संजय पवार, प्रदीप तांदळे, मधुकर बालटे, प्रकाश जैन, भालचंद्र सोनवणे, प्रताप काळे, जालिंदर पालवे, अन्वर शेख, संतोष खांडेकर, सचिनदादा, रियाज शेख, शेखर आंधळे, आदित्य पालवे, संकेत पादीर व इतर नगरप्रेमी उपस्थित होते.

अतिशय सकारात्मक प्रतिसाद या मंचास मिळत असून यात राजकारण व जाती धर्माचे विरहित शहराच्या विकासासाठी योगदान देऊ इच्छिणारे नगरकर सामील होउ शकतात. इच्छुक नगरवसियांनी मंचाचे संस्थापक संयोजक विजयकुमार पादिर मो. –९४२२२२५६६५ यांना संपर्क करावा.

पुढील मीटिंग दिवाळीनंतर लगेचच घेण्यात येईल त्यात पुढील दिशा ठरवण्यात येईल असे निश्चित करण्यात आले.

## घरफोड्या करणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांना पकडले ३ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

नगर – पाथर्डी व शेवगाव तालुक्यात घरफोड्या करणाऱ्या दोघा सराईत गुन्हेगारांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने भिंगार जवळील बेलेश्वर चौकात सापळा लावून पकडले आहे. सचिन ईश्वर भोसले (वय २१, रा.बेलगाव, ता.कर्जत) व सचिन बंबळ्या काळे (वय २१, रा.नागझरी, ता.गेवराई, जि.बीड) अशी त्यांची नावे असून त्यांच्याकडून ३ लाख ६ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

पाथर्डी व शेवगाव तालुक्यात अनेक घरफोड्या झाल्या होत्या. या गुन्ह्यांचा समांतर तपास करण्याचे आदेश पोलिस अधिक्षक राकेश ओला यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. दिनेश आहेर यांना दिले होते. त्यानुसार त्यांनी स्थानिक गुन्हे शाखेतील उपनिरीक्षक अनंत सालगुडे, पोलीस अंमलदार बबन मखरे, फुरकान शेख, भाऊसाहेब काळे, बाळासाहेब गुंजाळ, अमोल कोतकर, जालींदर माने, प्रशांत राठोड व अरूण मोरे यांचे पथक नेमून तपास सुरु केला.

तपास पथक आरोपीची माहिती घेत असताना बुधवारी (दि. १६) उपनिरीक्षक सालगुडे यांना गोपनीय माहिती मिळाली की, सदरचा गुन्हा हा सराईत आरोपी सचिन ईश्वर भोसले याने त्याचे साथीदारासह केला असुन ते पाथर्डीवरून अहिल्यानगर येथे येणार आहेत. या मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीस पथकाने नगर पाथर्डी रोडवर भिंगार जवळ बेलेश्वर चौक येथे थांबुन सापळा लावला. त्यावेळी दोन संशयीत इसम मोटार सायकलवर आल्याने त्यांना ताब्यात घेतले. त्यातील सचिन भोसले याच्याकडे २ लाख १० हजार रूपये किंमतीचे सोन्याचे दागीने, सचिन काळे याचे कडे ५६ हजार रूपये किंमतीचे सोन्याचे दागीने व एक मोटार सायकल असा एकुण ३ लाख ६ हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

या आरोपीकडे कसून चौकशी केल्यावर त्यांनी कासारपिंपळगाव, ता.पाथर्डी व सामनगाव ता.शेवगाव येथे घरफोडीचे गुन्हे त्यांचे फरार असलेले साथीदार गहिन्या ईश्वर भोसले व भगवान ईश्वर भोसले (दोघे रा.बेलगाव, ता.कर्जत) यांचेसह गुन्हा केल्याचे सांगीतले.

## नामनिर्देश पत्र दाखल करताना वाहनांच्या ताफ्यात तीनपेक्षा अधिक वाहने आणण्यास बंदी

नगर – भारत निवडणूक आयोगाने सार्वत्रिक विधानसभा निवडणूकीचा कार्यक्रम घोषित केला असल्याने जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये निवडणूक कालावधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल करतांना वाहनांच्या ताफ्यामध्ये तीन पेक्षा जास्त वाहने आणण्यास बंदीचे आदेश निर्गमित केले आहेत.

नामनिर्देशन पत्र दाखल करतांना निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाच्या १०० मीटर परिसरात तसेच दालनात पाच व्यक्तींव्यतिरिक्त कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात नामनिर्देशनपत्र दाखल करतांना कार्यालयाच्या परिसरात मिरवणूक सभा घेणे, कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे, वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणण्यास तसेच कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करण्यास प्रतिबंध घालण्यात आला आहे. हे आदेश २५ नोव्हेंबर पर्यंत जिल्ह्यात लागू राहतील, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# नगर शहर व संगमनेर विधानसभा मतदारसंघ आर्थिकदृष्ट्या संवेदनशील

### निवडणूक आयोगाकडून गंभीर दखल, अतिरिक्त पथकांमार्फत ठेवली जाणार नजर

नगर – केंद्रीय निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणुकीच्या काळात पैसे, दारू आणि अन्य भेटवस्तूंच्या वाटपाची शक्यता जिल्ह्यातील संगमनेर व नगर शहर या दोन मतदार संघात जास्त होणार असल्याची शक्यता व्यक्त केली आहे. हे दोन विधानसभा मतदारसंघ 'खर्चाच्या दृष्टीने संवेदनशील' ठरवली आहेत. या मतदारसंघांवर नजर ठेवण्यासाठी अतिरिक्त पथके तैनात केली जाणार असल्याची माहिती जिल्हा निवडणूक शाखेने दिली.

गुप्तचर विभागाने केंद्रिय निवडणूक आयोगाला जिल्ह्यातील १२ विधानसभा मतदार संघांबाबत गोपनीय अहवाल पाठविला आहे. मागील विधानसभा निवडणुकीच्या वेळेस प्राप्त झालेल्या तक्रारी आणि घटनांचा या अहवालामध्ये समावेश आहे. हे दोन्ही मतदार संघ हे शहरी भागाचा जास्त समावेश आहे. त्याच बरोबर झोपडपट्टीमधील मतदार संघाचाही जास्त समावेश आहे. या दोन्ही मतदार संघात निवडणुकीच्या तीन दिवस अगोदर पैसे, दारू आणि अन्य भेटवस्तूंचे वाटप होण्याची शक्यता व्यक्त केली आहे.

या मतदार संघात जादा पथके तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. त्याच बरोबर लहान–मोठ्या सर्वच घटनांवर लक्ष ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. निवडणूक कालावधीत आदर्श आचार संहितेचे पालन होते का? यावर लक्ष देण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. स्थानिक पोलीस आणि केंद्रिय निमलष्करी दलाचे अधिकारी–कर्मचारी यांची एकत्रित पथके राहणार आहेत. निवडणूक निरीक्षक (खर्च) यांनी उमेदवारांचे खर्च काटेकोरपणे तपासण्याचे निर्देश दिले आहेत.

या मतदार संघातील येणाऱ्या प्रमुख मार्गावर स्थिर पथके तैनात राहणार असून वाहनांची झडती घेतली जाणार आहे. इतर मतदार संघापेक्षा या मतदार संघासाठी जादा पथके राहणार आहेत. भरारी पथकांची संख्याही जास्त राहणार आहे. शेवटच्या तीन दिवसामध्ये पैसे, दारू आणि अन्य भेटवस्तूंच्या वाटपाची शक्यता गृहित धरून जादा पथके नियुक्त केले जाणार आहेत. दरम्यान, केवळ मतदारसंघच नव्हे तर मतदार संघामधील खर्चाच्या दृष्टीने संवेदनशील भागांचा शोधही घेण्यास आयोगाने जिल्हा निवडणूक अधिकारी व मतदारसंघाच्या निवडणूक अधिकार्यांना सांगितले आहे.

आयोगाने त्यासाठी विविध निकष ठरवून दिले आहेत. याशिवाय निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच्या सहा महिन्यात त्या मतदारसंघातून चलनाच्या मागणीत २० टक्क्यांपेक्षा अधिक वाढ झाल्याचा भारतीय रिझर्व बँकेचा अहवाल, काही मोजक्या खात्यातून प्रचंड मोठ्या संख्येच्या खात्यांमध्ये जमा होणाऱ्या रकमा, गेल्या सहा महिन्यात वाढलेले ऑनलाइन व डिजिटल पेमेंट, अशा विविध निकषानुसार खर्चाच्या दृष्टीने संवेदनशील मतदारसंघ निवडले गेले आहेत.

## विधानसभा निवडणूक काळात ध्वनीक्षेपकाच्या वापरास निर्बंध

नगर – भारत निवडणूक आयोगाने सार्वत्रिक विधानसभा निवडणूकीचा कार्यक्रम घोषित केला असल्याने जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी निवडणूक कालावधीत निवडणूक प्रचारासाठी ध्वनीक्षेपकाच्या वापरावर निर्बंधाचे आदेश निर्गमित केले आहेत.

ध्वनीक्षेपकाचा वापर संबंधित पोलीस विभागाच्या परवानगी शिवाय करता येणार नाही. रात्री १० ते सकाळी ६ या कालावधीत कोणत्याही क्षेत्रात तसेच फिरत्या वाहनांवर ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही. सर्व राजकिय पक्ष, उमदेवार व इतर व्यक्ती यांनी निश्चित ठिकाणी ध्वनीक्षेपकाचा वापर करावा. ध्वनीक्षेपकाचे वापरासंबंधी घेतलेल्या परवानगीची माहिती संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी तसेच संबंधित यंत्रणेस कळविणे बंधनकारक राहील.

आदेशाचा भंग करण्याऱ्यांविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३ प्रमाणे कारवाई केली जाईल, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# मतदान कैंद्रांच्या २०० मीटर परिसरात मोबाईल वापरास बंदी

नगर – भारत निवडणूक आयोगाने सार्वत्रिक विधानसभा निवडणूकीचा कार्यक्रम घोषित केला असल्याने जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये निवडणूक कालावधीत मतदान केंद्रांच्या २०० मीटर परिसरात मोबाईलचा वापर करण्यास बंदीचे आदेश निर्गमित केले आहेत.

जिल्ह्यात मतदान होणार असल्याच्या ठिकाणापासून २०० मीटर परिसरात मंडपे, दुकाने उभारण्यास बंदी राहील. तसेच मोबाईल फोन, स्मार्ट फोन, कॉर्डलेस फोन, पेजर, वायरलेस सेट, ध्वनीक्षेपके व इतर इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे बाळगण्यासही प्रतिबंध करण्यात आला आहे. निवडणूक निरिक्षक, जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक कामकाजाकरिता नेमणूकीस असलेले मतदान केंद्र अधिकारी, सूक्ष्म निवडणूक निरीक्षक, निवडणूक निर्णय अधिकारी, सहा. निवडणूक निर्णय अधिकारी, अतिरिक्त सहा. निवडणूक निर्णय अधिकारी, पोलीस अधिकारी व मतदार यांचे व्यतिरिक्त इतर व्यक्तीस प्रवेशाकरीता प्रतिबंध करण्यात आला आहे.

या परिसरात खाजगी वाहन आणण्यास किंवा संबंधीत पक्षाचे चिन्हाचे प्रदर्शन करण्यासही मनाई करण्यात आली आहे. हा आदेश २० नोव्हेंबर रोजी मतदान सुरू झाल्यापासून मतदान संपेपर्यंत अंमलात राहील, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## विधानसभा निवडणूक पार्श्वभूमीवर जिल्ह्यात मोर्चे, निदर्शनांना बंदी

नगर – भारत निवडणूक आयोगाने सार्वत्रिक विधानसभा निवडणूकीचा कार्यक्रम घोषित केला असल्याने जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये निवडणूकीच्या कालावधीमध्ये जिल्हाधिकारी कार्यालय, सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालय, सर्व तहसील कार्यालय आणि सर्व शासकीय विश्रामगृहे या ठिकाणी कोणत्याही प्रकारची मिरवणूक मोर्चा काढणे, आंदोलन, निदर्शने आणि उपोषण करण्यास बंदीचे आदेश निर्गमित केले आहेत.

विधानसभा निवडणुकीची आदर्श आचार संहिता अंमलात आल्याने जिल्ह्यात निवडणुकीची संपूर्ण प्रक्रीया शांततेत, निर्भयपणे व न्याय्य वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोणातून हे आदेश देण्यात आले आहेत. वरील नमूद ठिकाणी कोणत्याही प्रकारची घोषणा देणे, वाद्य वाजविणे किंवा गाणे म्हणणे आणि निवडणुकीचा प्रचार करण्यासही बंदी घालण्यात आली आहे. हे आदेश २५ नोव्हेंबर पर्यंत जिल्ह्यात लागू राहतील, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## दत्तात्रय शेंडे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – येथील सिव्हिल हडकोमध्ये राहणारे दत्तात्रय शंकर शेंडे (वय ५६) यांचे १७ ऑक्टोबर रोजी सकाळी ७ वाजता अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव, अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

शेंडे हे येथील जुना मंगळवार बाजार येथील डॉ. होशिंग यांच्या हॉस्पिटलमध्ये नोकरीला होते. ते स्वभावाने अत्यंत शांत होते. नेवासा येथील ते मूळचे रहिवासी होते.

त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. डॉ. अमोल शेंडे यांचे ते वडिल होत.



नगर छत्रपती संभाजीनगर रोड वरील बीटीआर गेट क्रमांक १ समोर गेल्या कित्येक दिवसांपासून पाण्याची पाईपलाइन फुटली असून, लाखो लिटर पाण्याची नासाडी होत आहे. याबरोबरच या भागात मनपा आयुक्तांच्या बंगल्याजवळही दोन तीन ठिकाणी ही पाईपलाइन फुटली असून, यामुळे येथील महामार्ग रस्ता खराब होण्याबरोबर येथून येणाऱ्या जाणाऱ्या दुचाकीस्वराच्या अंगावर पाणी उडत आहे. तरी ही पाणी गळती तातडीने थांबवावी, अशी मागणी येथून जाणारे नागरिक व वाहनधारक करत आहे. (छाया – महावीर पोखरणा)

## शासकीय कार्यालय परिसरात निवडणूक प्रचारास बंदी

### जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांचे आदेश

नगर – भारत निवडणूक आयोगाने सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला असल्याने जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी निवडणूक कालावधीत शासकीय कार्यालयांच्या परिसरात निवडणूक प्रचार करण्यास बंदी असल्याचे आदेश निर्गमित केले आहेत.

जिल्ह्यातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालये, सर्व शासकीय व निमशासकीय विश्राम गृहांच्या आवारामध्ये २५ नोव्हेंबर पर्यंत कोणत्याही राजकीय पक्षाने, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी, हितचिंतकांनी सभा घेणे, रॅली काढणे, निवडणुकीसंदर्भात पोस्टर्स बॅनर्स पॅम्प्लेटस् कटआऊटस् किंवा जाहिरात फलक लावणे, निवडणूकविषयक घोषवाक्य लिहिणे, या आवारात निवडणूकविषयक घोषणा देणे, मतदारांना प्रलोभन दाखविणे, निवडणूकीच्या कामात बाधा निर्माण होईल अशी कृती करणे, राजकीय कामासाठी सदर आवाराचा वापर करणे इत्यादी बाबींवर निर्बंध घालण्यात आले आहेत. आदेशाचा भंग करणाऱ्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३ प्रमाणे कारवाई केली जाईल, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### मधुमेहींसाठी उपयुक्त शेवगा

शेवग्याची पाने गर्भावस्थेत ब्लडशुगर लेव्हलला नियंत्रित ठेवतात. याला आपल्या आहारात सामील केल्याने तुम्ही मधुमेह टाळाल आणि गर्भावधी मधुमेह जो नेहमी गर्भवती महिलांना होत असतो त्यातून तुम्हाला नक्कीच सुटकारा मिळेल. एटीबॅक्टीरियल असल्यामुळे शेवग्या गळा, त्वचा आणि छातीत होणाऱ्या संक्रमणापासून बचाव करते.

## पाककला

### मिक्स ड्राय फ्रूट

**साहित्य** : ५० ग्रॅम काजूचे तुकडे, ५० ग्रॅम बदामाचे काप, ५० ग्रॅम किशमिश, ५० ग्रॅम पनीर छोटे तुकडे करून, १ सिमला मिरची, १ मोठा कांदा, २ मोठे टोमॅटो, अर्धा इंच आले, १ लहान चमचा मसाला, अर्धा मोठा चमचा तूप, मीठ चवीनुसार.

**कृति** : पनीरचे तुकडे मीठ व हळद मिसळलेल्या कोमट पाण्यात थोडा वेळ भिजत ठेवा. सिमला मिरचीचे चौकेनी तुकडे कापा. कांदा किसून घ्या. टोमॅटो बारीक चिरून घ्या. पॅनमध्ये तेल गरम करा. कांदा गुलाबीसर भाजा. बारीक चिरलेले आले, टोमॅटो, हळद टाका. नंतर ड्रायफ्रूटस टाकून थोडा वेळ परता. आता पनीर आणि सिमला मिरची टाकून थोडा वेळ शिजवा. अर्धा पेला पाणी ओतून झाकण ठेवा. नंतर २ मिनिटे शिजू द्या. गरम मसाला टाकून पुऱ्यासोबत वा चपाती पराठ्यांसोबत सर्व्ह करा.

## सल्ला

### भाज्यांच्या चवीमध्ये बदल करण्यासाठी

✻ जर आपण भाज्यांमध्ये नवनवीन चवी आजमावू इच्छित असाल तर मोहरी, खोबरेल अशा निरनिराळ्या तेलांमध्ये फोडणी द्या. यामुळे भाजीला नवी चव येईल. हवे तर यामध्ये निम्मे आपण रोज वापरत असलेले तेलही मिसळू शकता.

✻ डोळ्यांखालील काळवंडलेपणा दूर करण्यासाठी तेथे काकडीचा रस लावून हलके हलके चोळा. वीस मिनिटानंतर पाण्याने धुवा.

## वास्तू

मुलांची अभ्यासाची किंवा झोपण्याची खोली शक्यतो उत्तर किंवा उत्तर-पूर्व म्हणजेच इशान्येस असावी.

## सौंदर्य

केस चमकदार होण्यासाठी आंघोळीनंतर एक बाऊल किंवा भांड्यात कोमट पाणी घ्यावे. त्यात अर्धा चमचा व्हिनेगर टाकावे. त्याने केस मुळापर्यंत चोळून मग वाळवा. त्वरित केसांना चमक येते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

# दैनिक पंचांग

**शुक्रवार, दि. १८ ऑक्टोबर २०२४**

**---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, आश्विन कृष्णपक्ष, अश्विनी १३।२६, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०६ वा. ३१ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : राहते घर व जमिनीसंबंधी विषयांमध्ये स्थिती अनुकूल राहील.

**वृषभ** : कौटुंबिक जीवन आपल्यासाठी आनंद आणेल, पण खाण्या-पिण्याच्या बाबतीत काळजी घ्या. आरोग्य नरम-गरम राहील.

**मिथुन** : नवीन कामे, योजनांच्या बाबतीत स्थिती लाभदायक राहील. घरात किंवा कुटुंबात शुभप्रसंग घडतील.

**कर्क** : आपली कामे धाडसाने करा. मागील उधारी उसनवारी वसुल होईल. जुने मित्र भेटतील.

**सिंह** : आरोग्याची काळजी घ्या. कौटुंबिक वाद-विवाद टाळा. नोकरदार कामात व्यस्त राहातील.

**कन्या** : व्यापार-व्यवसायात जोखमीचे काम टाळा.

**तूळ** : व्यापारात वेळ मध्यम राहील. कामात काही विघ्न येऊ शकतात.

**वृश्चिक** : अधिकाऱ्यांपासून दूर राहा. धार्मिक कार्यांमध्ये खर्च होण्याची शक्यता आहे.

**धनु** : राजकीय व्यक्तींना काळ अनुकूल आहे. कौटुंबिक सुख वाढेल.

**मकर** : दैनंदिन कामात सातत्य राहणार नाही. अस्वस्थता जाणवेल. अडकलेली कामे योग्य वेळी पूर्ण होतील.

**कुंभ** : मिळकतीपेक्षा अधिक खर्च होईल. आपले काम धाडसाने करा.

**मीन** : पैशासंबंधी येणाऱ्या व अडचणी दूर होतील. आनंदाची बातमी मिळेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

# हसा आणि शतायुषी व्हा!

**शिक्षिका** – जो माझ्या प्रश्नाचे लवकर उत्तर देईल त्याला आज माझ्याकडून सुट्टी मिळेल..! गण्याने लगेच आपली बॅग वर्गाबाहेर फेकली

**शिक्षिका** – ती बॅग कोणी फेकली?

**गण्या** – मी आता घरी जाऊ का?

# ...वाढवूया आपले सामान्य ज्ञान

✻ भारताने अवकाशात सोडलेला पहिला कृत्रिम उपग्रह कोणता? – आर्यभट्ट

✻ ३ ग्रॉस पेन्सिली म्हणाजे किती पेन्सिली? – ४३२

✻ संतोश करंडक ही क्रीडा स्पर्धा कोणत्या खेळाशी संबंधीत आहे? – फुटबॉल

– **अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# फिल्मीचक्कर क्र. ११५९

सौ. शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | | ■ | ४ | ५ |
| ६ | | ■ | | ■ | ७ | | |
| | ■ | ८ | ■ | ९ | ■ | | ■ |
| | ■ | १० | | | ११ | | |
| ■ | १२ | | ■ | १३ | | | ■ |
| १४ | ■ | | ■ | ■ | | ■ | ■ |
| १५ | १६ | ■ | १७ | १८ | ■ | १९ | २० |
| २१ | | | | | | | |

**आडवे शब्द** :- १) 'तीसरी मंझिल, मेरा गांव मेरा देश, लव इन टोकियो, आन मिलो सजना' आदी चित्रपटांची नायिका ४) ++ सावन झूमके (चित्रपटाचे नाव) ६) ++ और शाम (चित्रपटाचे नाव) ७) एक गीतकार १०) 'मैने प्यार किया, दबंग, बॉडीगार्ड, एक था टायगर' आदी चित्रपटांचा नायक १२) ++ कहते है बडा नाम करेगा (गाणे) १३) 'मन डोले मेरा तन डोले' हे गाणे असलेला चित्रपट १५) ++ अग्निहोत्री (अभिनेत्री) १७) आधा दिन आधी ++ (चित्रपटाचे नाव) १९) तहान या अर्थाचा शब्द २१) 'धरमवीर, अमर अकबर अँथनी' आदी चित्रपटांचे दिवंगत निर्माता दिग्दर्शक

**उभे शब्द** :- १) राजेश खन्ना, शर्मिला टागोर यांचा गाजलेला एक चित्रपट २) ए ++ मस्ताने मदहोश किये जा (गाणे) ३) 'खूबसूरत, मिस्टर नटवरलाल, उमरावजान आदी चित्रपटांची नायिका ४) 'जो जीता वही सिकंदर' या चित्रपटाचा नायक ५) मेरे ++ तुझको बार बार आवाज मै न दूंगा (गाणे) ८) या चित्रपटासाठी मोहंमद रफी यांनी शेवटचे गाणे गायले ९) सारा +++ हसीनोंका दीवाना (गाणे) ११) यात श्रीदेवी आणि अमरीश पुरी यांच्या प्रमुख भूमिका आहेत १४) +++ वीर (चित्रपटाचे नाव) १६) ++ देवीयां (चित्रपटाचे नाव) १७) जीने की राह (चित्रपटाचे नाव) १८) ++ बदन (चित्रपटाचे नाव) २०) ++ परांजपे (दिग्दर्शिका)

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : पैसा हा सर्वांत मोठा उपद्रव आहे, कारण मनुष्य धनवान होताच तो लगेच बदलून जातो.

# मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

## काही व्यक्तींना उंचीची भीती का वाटते?

भीती वाटणे ही नैसर्गिक गोष्ट आहे. प्रत्येकाला कोणत्या ना कोणत्या गोष्टीची भीती वाटत असते. अंधाराची, सापाची, वाघाची, आजारपणाची अशा अनेक प्रकारच्या भीतीने लोक ग्रासलेले असतात. काही लोकांना उंचीची भीती वाटते. डोंगरावर गेल्यानंतर काही व्यक्ती घाबरून जातात. आपल्यापैकी कोणीही १०० मजली इमारतीच्या छतावर जाऊन खाली पाहू लागला, तर त्याला नक्कीच भीती वाटेल; पण पाचव्या मजल्यावर गेल्यावर क्वचितच कोणाला भीती वाटेल. उंचीची भीती वाटणारी व्यक्ती नुसते गिर्यारोहणाचे नाव काढताच घामाघूम होते. अशी भीती वाटणाऱ्या व्यक्तींमध्ये उंचावर गेल्यास झोप न येणे, भूक न लागणे, वाईट स्वप्न पडणे, हातपाय थरथरणे, खूप घाम येणे; ही लक्षणे दिसतात. रक्तदाबही वाढतो. वागण्यात चिडचिडेपणा येतो. एखाद्या वस्तूविषयी अवास्तव भीती बाळगणे, यालाच 'फोबिया' असे म्हणतात. तणावग्रस्त मानसिकता असण्याचे हे उदाहरण होय. हा एक प्रकारचा सौम्य असा मनोविकारच आहे. मनाचा विग्रह करून ही भीती काढण्याचा प्रयत्न केल्यास ती कमी होऊ शकते. मनोविकार तज्ज्ञाचा सल्ला घेणे अशा वेळी श्रेयस्कर ठरते, अन्यथा हा मानसिक रोग गंभीर रूप धारण करू शकतो.

## एकीचे बळ मोठे

एका जातक कथेतील वर्णनानुसार वाराणसीलगत एका गावातील एक सुतार रोज जंगलात जात असे. एकदा त्याने खड्ड्यात पडलेल्या जंगली कुत्र्याच्या पिल्याचा जीव वाचवला तेव्हापासून त्याला त्या पिलाचा लळा लागला. ते पिलू त्याला तेथे भेटत होते. ते पाहून इतरही जंगली कुत्रे त्याच्याजवळ येत असत. परंतु त्यांना सर्वांना एका वाघाने फार त्रस्त करून सोडले होते. तो रोज त्यांच्यावर हल्ले करत होता. सुताराने एक योजना बनविली. नेहमीप्रमाणे वाघ डोंगराच्या माथ्यावर आला.

सर्व कुत्री वेगवेगळ्या ठिकाणी थांबून त्याच्यावर भुंकू लागली. वाघाने चवताळून एका कुत्र्यावर झेप घेतली तसा तो कुत्रा खाली बसला.

वाघाची उडी थेट त्या कुत्र्याच्या मागे असणाऱ्या एका मोठ्या खड्ड्यात पडली. सगळ्या कुत्र्यांनी त्याच्यावर धाव घेतली व त्याच्यावर हल्ला करून त्याला ठार केले.

**तात्पर्य** : एकीचे बळ मोठे असते.

# जीवन चक्र - मृत्यू रहस्य (जीवन की रोशनी)



के बीज लेकर किसी दूसरे शरीर में चली जाती है। यह कारण शरीर, अपने विशाल साधनों के कारण अचेतन मन में सब से प्रबल इच्छा की पूर्ति के लिये उपयुक्त और नया शरीर प्राप्त करने में आत्मा की सहायता करता है । जीवन के मंच से चलने से पहले बीती ज़िन्दगी की पूरी फिल्म पर से मृत्यु के समय पर्दा उठा दिया जाता है। मृत्यु के बिस्तर पर पड़े मनुष्य को सच्चाई की झलक मिल जाती है परन्तु समय निकल चुका होता है। यह प्रक्रिया चलती रहती है। सृष्टि पर हर जीवन के अन्त पर, ज़िन्दगी और मौत का चक्कर, हर्ष-शोक, दुख-सुख के साथ नई गति पकड़ता हुआ एक असीम चक्र में कभी ऊपर कभी नीचे जाता रहता है। क्योंकि धरती पर अपने जीवन के दौरान यह कभी सन्तुष्ट नहीं होता और नई आशाएँ, इच्छाएँ और इनकी आपूर्ति के दुख जोड़ता रहता है और अनजाने में ही निरन्तर कर्मों के बीज बोता रहता है और फिर जन्म-जन्मान्तरों तक अपने आरम्भ किये गये संग्रामों और अपनी बनाई हुई फौजों से प्रकृति

### जीवन की रोशनी

हर व्यक्ति की मोह और इच्छा को शान्त करने के लिये कुम्हार के चाक की तरह भिन्न-भिन्न बर्तनों (शरीरों) के रूप में इसे साधन उपलब्ध कराती रहती है। सिर से लेकर पैरों तक इच्छाओं के भार के नीचे दबा हुआ इन्सान अपने आपको इनका सेवक बना लेता है। यदि मनुष्य इन इच्छाओं से मुक्त हो जाये तो प्रभुत्व का आनन्द ले सकता है। मनुष्य वास्तव में है क्या? परमात्मा इच्छाएँ, और परमात्मा क्या है ? इच्छा रहित इन्सान (आत्मा) । महान दार्शनिक कवि वर्डज़वर्थ ने अपनी कविता जवश जप खा- में एक बढ़ रहे बच्चे का बड़ा सुन्दर चित्र खींचा है:- 'सारे जीवन का सितारा, आत्मा जो हमारे साथ आती है, किसी और दुनिया की रहने वाली है और बड़ी दूर से आती है, पूरी तरह अचेतन स्थिति में नहीं और न ही पूरी तरह स्पष्ट स्थिति में बल्कि जब परमात्मा की ओर से हम घर में आते हैं तो हमारे पीछे शान की परछाइयाँ आती है। बचपन में परमात्मा हमारे पास

होता है। ज्यों-ज्यों बच्चा बढ़ता है जेलखाने (गृहस्थी मोह) की छाया इसे घेरना शुरू कर देती है। धरती माता अपनी गोद अपनी ही तरह की खुशियों से भर लेती है। उसकी दयालुता में भी एक अपनी तरह की तीव्र इच्छा छिपी होती है और माँ का दिल रखते हुये भी उसका उद्देश्य इतना छोटा नहीं। दाई अपने पालत बच्चे, भीतरी मनुष्य को उसके असली शाही महलों, जहाँ से वह आया, उसकी शान को भुलाने के लिये अपनी पुरी शक्ति लगा देती है।

इस तरह संसार में नज़र आ रहे जीवन का चित्र बड़ा पतित है। अपने प्रारब्ध में लिखा हुआ सब कुछ प्राप्त करके भी हम और अधिक शक्ति और कोष और अधिक इन्द्रियों के सुखों भोगों के लिये भूखे रहते हैं। प्रकृति की दी हुई सुविधाओं के लिये आभारी (धन्यावादी) होने की जगह हमें जो नहीं मिला, उसके लिये व्याकुल रहते हैं और इधर-उधर खोजते रहते हैं। प्रकृति हमारी अतृप्त भूख को चुपचाप देखती नहीं रह सकती और सरस की तरह अपनी जादू की छड़ी से हमें सूअरों में बदल कर गन्दगी से पेट भरने के लिये छोड़ देती है।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# शुद्ध जीवन जीने के मंत्र

हर छात्र बारी-बारी से अपने साथी को अपने बारे में सबकुछ बताए और प्रश्नों के उत्तर दे। १०.४ छात्रों से कहें कि वे सुनी हुई बुरी बातों या दुराग्रहों को आपस में साझा करें और उन्हें झट से पोस्टर बोर्ड पर या कहीं और लिख दें। इसके बाद उनसे कहें कि उनके बारे में अच्छे वाक्य कौन से कहे जा सकते हैं। ऐसे वाक्य, जो कहीं अधिक सहनशील रवैए को दरशाते हों, परंतु उनमें अपनी बात पर अडिग रहने का भाव भी हो। जैसे- हाँ, यदि हम सभी क्लोन होते तो संभवत: यह एक महान् जगत् न बन पाता।''अगर तुम उसके स्थान पर होतीं तो क्या करतीं?' कुछ छात्रों से कहें कि वे इन प्रत्युत्तरों के लिए मॉडल बनें, उनकी सराहना करें।

११. सहयोग - ११.१ पाँच बच्चों के प्रत्येक समूह को एक मीटर की छड़ दें। उन्हें कहें कि वे मैदान की लंबाई-चौड़ाई को मापें और पूरी टीम से उसकी मदद लें। उन्हें जल्दी- से-जल्दी और सटीक माप लानी है। उन्हें पाँच मिनट का समय दें, ताकि वे आपस में इसके लिए कोई तकनीक चुन सकें। इसके बाद कक्षा आपस में बात कर सकती है कि उन्हें किन बातों से मदद मिली या किन बातों के कारण टीम के काम में बाधा आई

११.२ उनके बीच सच्चे सहयोग या स्नेह के साथ दिए गए सहयोग के बारे में चर्चा करें। हो सकता है कि कोई दल ऐसा चित्र भी अंकित करना

### अपने आप से प्रेम करना

चाहे, जिसमें सच्चे सहयोग बनाम दिखावे के सहयोग को अंकित किया गया हो।

११.३ किसी ऐसी परियोजना में सच्चे सहयोग के नियमों को लागू करें, जिसे करने में कक्षा को आनंद आए।

११.४ कक्षा को तीन दलों में बाँटें और उनसे कहें कि वे नृत्य के माध्यम से सहयोग की भावना का प्रदर्शन करें। वे अपनी पसंद का संगीत चुन सकते हैं।

१२. एकता - १२.१ जानवरों और उनकी एकता के बारे में जानने का आनंद लें; जैसे डॉलफिन और हाथी । (जब भी कोई खतरा आता है तो बड़े जानवर बच्चों को घेरे के भीतर ले लेते हैं।) उनकी एकता की कहानियाँ तलाशें और सुनाएँ, जैसे- ईसप की कथाओं में शेर और बैलों की कहानी आती है।

१२.२ एक साथ मिलकर किसी ऐसी परियोजना की हामी भरें, जिसमें सबको एक साथ आगे आने का अवसर मिल सके।

१२.३ स्कूल के अगले अंतरराष्ट्रीय दिवस या शांति दिवस के लिए एकता पर आधारित संगीत तैयार करें।

राजयोग ध्यान के लाभ - राजयोग ध्यान के लाभ राजनेता, वैज्ञानिक तथा अन्य उच्च स्तरीय अधिकारी इस शोषित संसार को बदलने में अक्षम रहे हैं। यदि हमने अपने तौर-तरीके नहीं बदले तो वे हमें केवल आसन्न संकट और विनाश के लिए चेतावनी दे सकते हैं। वे हमें प्रेरित कर सकते हैं, परंतु हमें हमारे कार्बन फुटप्रिंट को घटाने तथा प्राकृतिक संसाधनों के विवेकपूर्ण उपयोग के लिए राजी नहीं कर सकते। हम तभी बदलेंगे, जब हम बदलना चाहेंगे या हमें प्राकृतिक आपदाएँ बदलाव लाने के लिए विवश कर देंगी।

भारत में बंदरों को पकड़ने के लिए एक विधि अपनाई जाती है। वे एक तंग मुँहवाले जार में खाने की वस्तु डाल देते हैं। बंदर उसमें हाथ डालकर खाने की वस्तु तो मुट्ठी में भर लेता है, परंतु जब वह मुट्ठी बाहर निकालने का प्रयत्न करता है तो उसे बाहर नहीं निकाल पाता। वह अपना हाथ तभी बाहर निकाल सकता है, जब अपने खाने की वस्तु को वहीं छोड़ दे; परंतु वह ऐसा भी नहीं करना चाहता। वह पकड़ा जाता है, क्योंकि वह खाने का लोभ नहीं त्याग पाता। मनुष्यों के रूप में हम अपने वर्तमान विनाशक ढाँचों में केवल तभी बदलाव लाते हैं, हम अपने प्रेम, शांति, सुरक्षा व प्रसन्नता की माँग को पूरा करने के लिए कुछ बेहतर पा लेते हैं।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

गर्भाधान विधीच्या काळात सकारात्मक विचारसरणी असावी, तामसी आहार करू नये. संध्याकाळचे जेवण पोटभर करू नये. क्रोध, चिंता, शोक या गोष्टींपासून लांब राहावे. गर्भाधान विधीच्या संध्याकाळी स्नान करून कुलदेवतेला वंदन करून शुभ्र वस्त्रे परिधान करावीत. शयनगृहात धूप, फुले, अत्तर यापैकी मनाला आनंद देणाऱ्या वस्तू ठेवाव्यात. देवाजवळ निरंजन लावावे. गर्भामध्ये सुसंस्कारित आत्म्याचा प्रवेश होण्यासाठी ईष्टदेवतेजवळ प्रार्थना करावी. दिव्याची ज्योत साधारणतः दोन फूट अंतरावर ठेवून दिव्याकडे पतीपत्नीने एकटक पाहावे.

**'अंतज्योतिबहियोतिः प्रत्यक् ज्योति, परात्परम् ।**
**ज्योति ज्योतिः स्वयंज्योतिः आत्मज्योति शिवेस्मिहम् ।।**

ज्योतीला आत्मा मानून आपण त्यावर संस्कार करीत आहोत असे मानावे. ज्योत आतली असो वा बाहेरची ती परब्रह्मस्वरूप मंगल व पवित्र आहे. अशा प्रकारे पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश ही पंचमहाभूते व वात, पित्त, कफ हे त्रिदोष आणि जीव-आत्मा यांपासून गर्भ तयार होतो चांगला गर्भ व चांगल्या जीवात्म्याचा प्रवेश होण्यासाठी ईष्टदेवतेजवळ प्रार्थना करावी. दोघांनी शुभ्र, फिक्या रंगाचे वस्त्र परिधान करून ग्लासभर गायीचे दूध प्यावे. शयनगृहामधील

### गर्भाधान विधी

वातावरण सुंदर, स्वच्छ व पवित्र असावे. शय्या आकाराने मोठी असावी. त्यावर घातलेली चादर स्वच्छ फिक्या रंगाची असावी. दोघांच्याही मनात परस्परांविषयी प्रेमभाव असावा. शयनगृहातील प्रसन्न वातावरणामुळे दोघांमध्ये उत्साह वाढण्यास मदत होते. त्यानंतर सुगंधी फुलांनी सजलेल्या शय्येवर बसावे व खालील मंत्र म्हणावा.

**अहिरसि आयुरसि सर्वतः**
**प्रतिष्ठाऽसि धाता त्वा ददतु ।**
**विधाता त्वा दधातु ब्रह्मवर्चसा भव ।।**
**ब्रह्मा बृहस्पतिर्विष्णुः सोमः सूर्य स्तथा ऽश्विनौ ।।**
**भगो ऽथ मित्रवरुणौ वीरं ददतु मे सुतम् ।।**

– चरक शारीरस्थान

हे बाळा, तू सूर्यासारखा तेजस्वी हो, तुझ्या येण्याने माझी प्रतिष्ठा वाढेल, तू आमचे सर्वस्व आहेस विधाता तुझे रक्षण करो.

हे ब्रह्मदेवा, बृहस्पति, विष्णू, सोम, सूर्य, अश्विनकुमार, वरुणदेवता, भगमित्रादिदेवता मी तुम्हा सर्वांना विनंती करतो की, आपण मला शूर, उत्तम, सुसंस्कारित व आरोग्यपूर्ण संतती द्यावी. अशा प्रकारे मंत्र म्हटल्यावर समागम करावा. यातून उत्कृष्ट अशी गर्भधारणा होते. हा गर्भाधान विधी १० व्या दिवसापासून १८ व्या दिवसापर्यंत करावा. या विधीमुळे जन्माला येणारे बाळ इतर बाळापेक्षा निश्चितच उत्कृष्ट, सुसंस्कारित, तेजस्वी असते.

### षोड्श संस्कार (सोळा संस्कार)

भारतीय संस्कृतीमध्ये उगम पावलेल्या आयुर्वेदशास्त्रात षोडश संस्कार सांगितलेले आहेत.

षोड्श म्हणजे सोळा संस्कार! यांचा जीवन जगत असताना वेळोवेळी उपयोग होतो. जन्मापासून ते मृत्यूपर्यंत बाल्यावस्था, तारुण्यावस्था व वार्धक्यावस्था या अवस्थांमध्ये वेळोवेळी हे संस्कार केले जातात. संस्कार म्हणजे वारंवार एखादी गोष्ट करीत राहणे. संस्कार केल्यामुळे आपल्या गुणांमध्ये योग्य ते परिवर्तन आपण घडवू शकतो; त्यामुळे हे षोड्श संस्कार योग्यवेळी केल्याने मनुष्याची शारीरिक, मानसिक, बौद्धिक घडण उत्तम पद्धतीने होऊ शकते.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांड्ळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# विचार भारतीच्या महिला प्रबोधनात्मक प्रवचनांचा १९ ऑक्टोबरला समारोप

हिंदुत्ववादी वक्ते सुरेश चव्हाणके यांची उपस्थिती



सुरेश चव्हाणके

नगर – नवरात्रोत्सवात नगरच्या विचार भारतीच्या वतीने जागर मातृशक्तीचा या प्रबोधनात्मक उपक्रमांतर्गत शहरात ९ दिवस विविध ठिकाणी महिला सुरक्षिततेसाठी जनजागृती होण्यासाठी प्रबोधनात्मक प्रवचनांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये भागवत व रामायण कथाकार हभप ॲड.राजश्री कडलग माहाराज यांनी मार्गदर्शन करत महिलांच्या सुरक्षिततेसाठी आपली सनातनी संस्कृतीच महत्वाची असल्याचे सांगून महिला व मुलींमध्ये प्रबोधन केले होते. या महिला व समाज प्रबोधनात्मक प्रवचनांचा समारोप १९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता सावेडीच्या माऊली सभागृहात होणार आहे. यावेळी सुदर्शन चॅनलचे प्रमुख व प्रभावी हिंदुत्ववादी वक्ते सुरेश चव्हाणके यांचे शिवप्रेरणा अभियाना अंतर्गत 'सजग रहो' ह्या विषयावर मार्गदर्शन होणार आहे, अशी माहिती विचार भारतीचे उपक्रम प्रमुख रवींद्र बारस्कर यांनी दिली.

या कार्यक्रमात अहिल्यानगरीत नवरात्रोत्सव साजरे करणारे मंडळ आणि भजनी मंडळात कार्य करणाऱ्या भगिनींचा सत्कार करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास सर्व भगिनींनी आपल्या मैत्रीणी, स्नेही मंडळींसह उपस्थित राहवे, असे आवाहन सचिव सुधीर लांडगे, अशोकराव गायकवाड, अनिल मोहिते व कमलेश भंडारी यांनी केले आहे.

# मराठी भाषा जगाच्या अंगणात खेळण्यासाठी साहित्यीकांचे योगदान महत्वपूर्ण

## डॉ.लिलाताई गोविलकर यांचे प्रतिपादन; अ.नगर जिल्हा वाचनालय आणि नवयुग चॅरीटेबल ट्रस्टच्या परिसंवादात साहित्यीकांचा आनदोत्सव

नगर – मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा आज जाहिर झाला असला तरी संत ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीतून नामदेवाच्या असंगातुन मराठी भाषेने गेली अनेक वर्षात जगभरात आपले श्रेष्ठत्व सिद्ध केले आहे. अभिजात मराठी भाषेला मिळालेल्या या बहुमानानंतर मराठी भाषा जगभरातील असंख्य देशातील अंगणात खेळली पाहिजे. यासाठी अनुवादाच्या व तंत्रज्ञानाच्या माध्यमातुन मराठी साहित्यीकांचे योगदान महत्वपुर्ण असेल असा आशावाद मराठी सहित्यांच्या ज्येष्ठ अभ्यासिका व साहित्यीका डॉ.लिलाताई गोविलकर यांनी व्यक्त केला.


अ.नगर जिल्हा वाचनालय व नवयुग चॅरीटेबल ट्रस्टच्या वतीने आयोजित साहित्यीक परिसंवाद प्रसंगी बोलतांना साहित्यीक डॉ.लिलाताई गोविलकर. (छाया – सुरेश मैड)

अ.नगर जिल्हा वाचनालय व नवयुग चॅरीटेबल ट्रस्टच्या वतीने अभिजात मराठी भाषेचा दर्जा प्राप्त झाल्यानंतर साहित्यीक, वाचक यांच्या माध्यमातून वर्षभर राबविण्यात येणार्या उपक्रमा विषयी तसेच आनंदोत्सव साजरा करण्यासाठी आयोजित परिसंवाद प्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लोकसाहित्याचे अभ्यासक डॉ.अनिल सहस्त्रबुद्धे, वाचनालयाचे अध्यक्ष प्रा.शिरिष मोडक, कार्यक्रमाचे प्रवर्तक नवयुग चॅरीटेबल ट्रस्टचे प्रमुख संजय पारनाईक, पेमराज सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्या व आदिवासी साहित्याच्या अभ्यासिका डॉ.माहेश्वरी गावित, वाचनालयाच्या उपाध्यक्ष दिलीप पांढरे, प्रा.ज्योती कुलकर्णी, शिल्पा रसाळ, मसपाचे अध्यक्ष किशोर मरकड, कवी चंद्रकांत पालवे, आदीं उपस्थित होते.

डॉ.गोविलकर यांनी आपल्या अभ्यासपूर्ण मनोगतात मराठी भाषेच्या असंख्य पुस्तकांचे भारतातील अनेक भाषेत भाषांतर झाल्याने अनेक भाषेला मराठीने सामावून घेतले. हाच आलेख चढता राहुन परदेशातील भाषेमध्ये मराठी साहित्य अनुवादीत व्हावे, संत साहित्याचा वारसा जगभरात जावा. यातुन खऱ्या अर्थात आपली मराठी जगभरात आपला वेगळा ठसा उमटवू शकेल, असा विश्वास डॉक्टर गोविलकर यानी व्यक्त केला.

प्राचार्य डॉ.अनिल सहस्त्रबुद्धे यांनी कालीदासापासून मराठी माणुस शिल्लक असे पर्यंत मराठी हि वाढतच जाणार असल्याने भाषेविषयी अकराण भिती बाळगण्याचे कारण नाही. इंग्रजी शाळेचे महत्व वाढत असतांना मराठी प्रेमी साहित्यीक वाचक, वाचनालये यांनी तेथे जाऊन त्यांना कथा, कविता, स्पर्धा या माध्यमातुन मराठी वाचनाची गोडी उगवत्या पिढीला लावली तर मराठी ही उखाणे वृद्धीगंत होईल. यासाठी आपण मराठी प्रेमीनी जागल्याची भुमीका घ्यावी अशी अपेक्षा व्यक्त केली.

प्राचार्या डॉ.माहेश्वरी गावित यांनी आशयपुर्ण मनोगतात आपल्या मराठीत तीन हजार पेक्षा जास्त बोली भाषा आहेत. त्यांचे जतन करणे ही काळाची गरज आहे. मराठी भाषकांची संख्या साडेबारा कोटी आहे. व ती वाढतच जाणार असल्याने आपल्या भाषेचे महत्व वाढणार आहे. यातील मराठी साहित्याची गोडी उगवत्या पिढीमध्ये वाढण्यासाठी ते वाचते व लिहिते होण्याची सुरवात आहिल्यानगर पासून व्हावी. शाळा महाविद्यालयात कथा, कविता, यासारख्या असंख्य साहित्य प्रकाराची ओळख, ती वृद्धीगंत होण्यासाठीच्या मार्गदर्शन कार्यशाळा, स्पर्धा अशा कृतीशिल उपक्रमाची चळचळ व्हावी अशी अपेक्षा व्यक्त करुन सारडा महाविद्याल, अ.नगर जिल्हा वाचनालय, आणि नवयुग ट्रस्टच्या माध्यमातून याची सुरवात लगेचच करु या असे प्रतिपादन केले.

प्रास्ताविकात अ.नगर जिल्हा वाचनालयाचे प्रा.शिरिष मोडक यांनी अभिजात मराठी भाषेचा दर्जा ही आनंदायी गोष्ट असून याच माध्यमातुन सुमारे पावने दोनशे वर्ष जिल्हा वाचनालय यासाठी अविरत वाचन संस्कृती चळवळ चालविते आहे. आज नवयुगच्या पुढाकारातुन सुरु होणारी साहित्य विश्वातील क्रांतीकारी चळवळ मराठी भाषेला, साहित्यीक व साहित्य यांना लोकाभिमुख दर्जा प्राप्त करुन देतील असा आशावाद व्यक्त केला.

कार्यक्रमाचे संयोजक उद्योजक व नवयुक ट्रस्टेच प्रमुख संजय पारनाइक यांनी स्वागत करुन मराठी भाषा, साहित्य हे उगवत्या पिढी पर्यंत घेवुन जाण्यासाठी पुढील वर्षभर व्यापक उपक्रम घेण्यासाठी येणार आहे. आज त्याचा प्रारंभ व साहित्यीकांचे मार्गदर्शन यातुन याला क्रांतीकारी दिशा मिळेल असा आशावाद व्यक्त केला.

याप्रसंगी उद्योजक नवनाथ धुमाळ, डॉ.सुनिल कात्रे, ज्योती केसकर, शिल्पा रसाळ, प्रा.ज्योती कुलकर्णी, कवी चंद्रकांत पालवे, मसपा नगर जिल्हा अध्यक्ष किशोर मरकड, दशरथ खोसे, पक्षीमित्र डॉ.सुधाकर कुऱ्हाडे, डॉ.वर्षा किर्तने, कवी सुभद्रासुत आंधळे, शब्बीर शेख अहमद बिलाल, सौ. निर्मला मांडे, कुलकर्णी ज्ञानेश्वर, अरविंद ब्राम्हणे, डॉ.लक्ष्मीकांत येलवंडीकर यांनी वैशिष्ट पुर्ण संकल्पणातुन ही चळवळ व्यापक होण्यासाठी मार्गदर्शन केले.

यावेळी उद्योजक राजीव गुजर, प्रा.विश्वास काळे, प्रा.आर.जी.कुलकर्णी, किशोर यत्ते, माधवी कुलकर्णी, सखाराम गोरे, ग्रंथपाल अमोल इथापे, सहा.ग्रंथपाल नितिन भारताल, सावेडी जिल्हा वाचनालयाच्या सौ.सारिका देव, संकेत फाटक, पौर्णिमा गायकवाड, साक्षी पद्मा, दिपाली कल्याणम उपस्थित होते. सुत्रसंचालन सौ.गौरी जोशी, शिल्पा रसाळ, स्वागत प्रा.मोडक, तर आभार ज्योती कुलकर्णी यांनी मानले.

# कोजागिरी पौर्णिमा म्हणजे शिवशक्ती व कर्तृत्वाचा संगम

## डॉ. वृषाली कवळे यांचे प्रतिपादन; स्पर्धेत सहभाग नोंदवून महिलांनी पटकाविले पैठणी साडीचे बक्षीस

नगर – कोजागिरी पौर्णिमा म्हणजे शिवशक्ती व कर्तृत्वाचा संगम आहे. महिलांनी आपल्या मधील क्षमता, कला–गुण ओळखून ते वृध्दींगत करुन स्वत:चे कर्तृत्व सिध्द करावे. सण–उत्सवात महिलांनी एकत्र येऊन आनंद घेतल्यास विचारांची देवाण–घेवाण होत असते. महिला सर्व कुटुंबीयांना आनंद देत असताना, स्वत:साठी वेळ देऊन जीवनाचा आनंद घेण्याचे डॉ. वृषाली कवळे यांनी आवाहन केले.


प्रयास व नम्रता दादी–नानी ग्रुपच्या वतीने महिलांसाठी आयोजित कोजागिरी पौर्णिमा कार्यक्रमप्रसंगी डॉ. वृषाली कवळे. समवेत सहभागी स्पर्धक महिला.

प्रयास व नम्रता दादी–नानी ग्रुपच्या वतीने महिलांसाठी कोजागिरी पौर्णिमेचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. महिलांनी कोजागिरी पौर्णिमेचा आनंद लुटून विविध स्पर्धेत सहभाग नोंदवला. ग्रुपच्या माध्यमातून सामाजिक योगदान देणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला.

ग्रुपच्या ३१ व्या वर्धापन दिनाच्या पार्श्वभूमीवर हा सोहळा रंगला होता. यावेळी दादी–नानी ग्रुपच्या अध्यक्षा जयाताई गायकवाड, डॉ. वृषाली कवळे, मीनल खेडकर, सावेडी ग्रुपच्या अध्यक्षा रजनी भंडारी, उपाध्यक्षा अनिता काळे, उषा सोनी, सचिव हिरा शहापुरे, रेखा फिरोदिया, जयश्री पुरोहित, प्रयास ग्रुपच्या संस्थापक अध्यक्षा अलकाताई मुंदडा, सल्लागार विद्या बडवे, सविता गांधी, मेघना मुनोत, वंदना गारुडकर, राखी जाधव, नीलिमा पवार, ज्योती गांधी, उषा सोनटक्के, प्रतिभा भिसे, सोहनी पुरनाळे, सुजाता पुजारी, अर्चना बोरुडे, उज्वला धस, आरती थोरात, ज्योत्स्ना कुलकर्णी, शशिकला झरेकर, शकुंतला जाधव, आशा गायकवाड, साधना भळगट, ममता दाणी आदी उपस्थित होत्या.

प्रास्ताविकात विद्याताई बडवे यांनी ग्रुपच्या माध्यमातून मागील ३० वर्षापासून सुरु असलेल्या सामाजिक कार्याचा आढावा घेतला. यावेळी महिलांसाठी विविध मनोरंजनात्मक व बौध्दिक स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेला महिलांचा प्रतिसाद लाभला. दीपा मालू यांनी महिलांसाठी विविध स्पर्धा घेतल्या. विजेत्या महिलांना डॉ. वृषाली कवळे यांच्या वतीने पैठणी साडीचे बक्षीसं देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिपाली दाऊतकर व सारिका कासट यांनी केले. आभार अनिता काळे यांनी मानले.


अनुसूचित जाती–जमाती आरक्षणासाठी आयोग नेमल्याबद्दल लहुजी शक्ती सेनेतर्फे सिद्धार्थनगर येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याजवळ कार्यकर्ते एकमेकांना पेढे भरविताना.

# लहुजी शक्ती सेनेचे शहरात पेढे वाटून जल्लोष

नगर – अनुसूचित जाती–जमातीच्या आरक्षणाचे वर्गीकरण होण्यासाठी शासनस्तरावर समिती गठित होऊन आयोग नेमला गेला असून, यासंदर्भात शासन निर्णय निर्गमीत झाल्याने शहरात लहुजी शक्ती सेनेच्या वतीने जल्लोष करण्यात आला. यासंदर्भात नुकतेच सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला होता. तर आयोग नेमला जाऊन समिती गठित झाल्याने मातंग समाजामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सिद्धार्थनगर येथील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास अभिवादन करुन पेढे वाटप करुन लहुजी शक्ती सेनेने आनंदोत्सव साजरा केला. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे, विजय पठारे, राजाराम काळे, अखिलेश शिंदे, कृष्णा अडागळे, मनोहर शिंदे, संतोष उमाप, किरण नगरे, संतोष शिरसाठ, आकाश जगधने, प्रविण वैरागर, सिताराम शिरसाठ, सुनिल सकट, छबाबाई शिंदे, अशोक भोसले, लहू खंडागळे उपस्थित होते.

# इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज : वाचन प्रेरणा दिन व लेखक–वाचक सुसंवाद उत्साहात साजरे

नगर – बी.पी.एच.ई. सोसायटीचे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज तीन दशकांपासून व्यवस्थापन शिक्षणात कार्यरत आहे. संस्थेला एन.ए.ए.सी., बंगलोरकडून पुनः मान्यता मिळाली आहे आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा 'सर्वोत्कृष्ट संस्था' पुरस्कार प्राप्त झाला आहे. लायब्ररीने डिस्कव्हरी मीडिया प्रायव्हेट लिमिटेड, नवी दिल्लीकडून 'बी–स्कूल लायब्ररी पुरस्कार' मिळवला आहे.

डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात येतो, ज्याचा उद्देश त्यांच्या योगदानाचे स्मरण करणे आणि वाचनाची आवड वाढवणे हा आहे. IMS लायब्ररीने या कार्यक्रमात 'लेखक–वाचक सुसंवाद' हा बुक टॉक शो आयोजित केला, ज्यामध्ये लेखक आपले अनुभव व प्रेरणादायी विचार मांडतात. वाचन संस्कृतीचा विस्तार आणि विकास हा जाणकार आणि माहिती संपन्न समाज निर्मिती, व्यक्तिमत्व विकास, साहित्यिक विकास, आणि भाषा विकास यासाठी आवश्यक आहे. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या छायाचित्राला आणि संस्थापक डॉ. बी.पी. हिवाळे यांच्या छायाचित्राला पुष्पहार अर्पण करून, दीपप्रज्वलन करून झाली. संचालक डॉ. एम. बी. मेहता यांनी उपस्थितांचे स्वागत केले व सत्कारानंतर भाषणे झाली.



इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज : वाचन प्रेरणा दिन व लेखक–वाचक–सुसंवाद प्रसंगी माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना अभिवादन करताना उपस्थित वक्ते व प्राध्यापक वर्ग. दुसऱ्या छायाचित्रात उपस्थित श्रोते.

डॉ. मंगेश वाघमारे (व्यवसाय प्रशासन विभागाचे प्रमुख आणि नवे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, अहमदनगर येथील प्राध्यापक) यांनी सांगितले की वाचनाच्या सवयीमुळे आपण यशाच्या शिखरापर्यंत पोहोचू शकतो. आत्मविश्वास, ध्येय, आणि चिकाटी यांसोबत मजबूत वाचनाची सवय विकसित करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. पारंपरिक पद्धतींबरोबरच नवीन तंत्रज्ञान–जसे की ई–बुक्स, ऑडिओबुक्स, पुस्तकांच्या पॉडकास्ट सारांश, आणि चाटजीपीटी–हे नैतिक पद्धतीने वापरणे आवश्यक आहे. वाचनामुळे सृजनशीलता आणि तक्तात्मक विचार यांची जोपासना होते. त्यांनी स्पष्ट केले की 'वाचन' म्हणजे 'वचन,' म्हणजेच शपथ, आणि १००% यशाकडे जाणारा मार्ग या वचनात आहे. जर आपण वाचन प्रेरणा दिनाचा योग्य वापर केला, तर तो खरोखरच अर्थपूर्ण होईल आणि डॉ. ए.पी. जे. अब्दुल कलाम यांना एक योग्य श्रद्धांजली ठरेल. डॉ. वाघमारे यांनी तक्तात्मक विश्लेषण, आणि संवाद कौशल्यांचे महत्त्व देखील अधोरेखित केले. त्यांच्या सादरीकरणात प्रभाव आणि विनोद होता, कारण त्यांनी आपल्या विद्यार्थी जीवनातील कथा सांगितल्या, ज्यामुळे ते प्रेक्षकांशी त्वरित जोडले गेले.

सुमेध गुप्ते (बिझनेस स्टँडर्डमध्ये वरिष्ठ क्षेत्रीय व्यवस्थापक) यांनी एकविसाव्या शतकाला भारताचे शतक होण्याची क्षमता असलेल्या विषयावर भाषण दिले. त्यांनी सृजनशीलता, नावीन्य, आणि सकारात्मक दृष्टिकोनाचे महत्त्व अधोरेखित केले. यशासाठी आवश्यक कौशल्ये म्हणजे संवाद, नातेसंबंध निर्माण करणे, आणि टीम नेतृत्व, तसेच शांत मन असलेल्या व्यक्ती, शेवटच्या क्षणी निर्णय घेण्याची क्षमता, आणि बहुकार्य करण्याच्या कौशल्यांचा समावेश केला. त्यांनी पुढे सांगितले की जबाबदारी, दृष्टीकोन, आणि उद्दिष्टपूर्ती यांसारखे गुण महत्त्वाचे आहेत आणि यावर सतत काम करणे आवश्यक आहे. सकारात्मक दृष्टिकोन, आत्मप्रेरणा, आत्मविश्वास, आणि समर्पण हे भविष्यातील नेत्यांचे मुख्य गुण आहेत, जे भारताच्या प्रगतीला मार्गदर्शन करतील. त्यांच्या सादरीकरणात कॉर्पोरेट जगतातील अनेक उदाहरणांचा समावेश होता आणि विद्यार्थ्यांसोबत त्याच विषयावर प्रश्नोत्तरे घेण्यात आली. त्यांच्या सादरीकरणाने वास्तवाची जाणीव दिली आणि कॉर्पोरेट जगाकडून अपेक्षांचे उच्चाटन केले.

सहकार्य आणि समर्पणाचे अद्भुत प्रदर्शन म्हणून, २०२४–२५ शैक्षणिक वर्षाच्या विद्यार्थी ग्रंथालय समितीने संस्थेत एक कार्यक्रम यशस्वीरित्या आयोजित केला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी अनेक महत्त्वाची भूमिकांची भूमिका निभावली, ज्यात एमबीए–II च्या साक्षी बोगावतने दीप प्रज्वलित केले. एमसीए–I च्या शर्गिल इक्बालने सूत्रसंचालन केले. याव्यतिरिक्त, एमसीए–I च्या रिफत बागवान आणि एमबीए–I च्या अल्फिया खिलजी यांनी मान्यवर वक्तयांचे परिचय दिले. साक्षी कवरे आणि कल्याणी रामदिव यांनी मदत केली, तर श्रध्दा अकोलकर यांनी फीडबॅक फॉर्म वितरित केले. एमबीए–I च्या सिद्धी गांधी यांनी धन्यवाद भाषण दिले, तर अथर्व वैद्य आणि युसुफ शेख यांनी शिस्त राखली. समितीच्या प्रयत्नांनी फक्त ग्रंथालयाच्या व्यस्ततेचे महत्त्व अधोरेखित केले नाही, तर आमच्या विद्यार्थ्यांच्या नेतृत्व आणि संघटन कौशल्याचे प्रदर्शन देखील केले.


डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट ॲण्ड रुरल डेव्हलपमेंट महाविद्यालयाचे संशोधन कार्यशाळेप्रसंगी करताना प्रा. शुभदा नगरकर, डॉ. भाऊसाहेब पानगे आदी.

# डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशन, इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट ॲण्ड रुरल डेव्हलपमेंट महाविद्यालयामध्ये संशोधन कार्यशाळा उत्साहात

नगर – संशोधन पद्धती व संशोधन प्रकाशनाची नितीतत्वे पी.एच.डी. संशोधक तसेच पी.एच.डी. गाईड यांना अवगत असावे या उद्देशाने संशोधन केंद्र व ग्रंथालय विभागातर्फे २८ सप्टेंबर रोजी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेसाठी प्रमुख वक्त्या प्रोफेसर डॉ. शुभदा नगरकर, समन्वयक सेंटर फॉर पब्लिकेशन एथिक्स, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांनी विद्यार्थ्यांना संशोधन कसे असावे, संशोधन प्रकाशनासाठी लागणाऱ्या आवश्यक माहिती व संशोधन प्रकाशनाची नितीतत्वे यावर सखोल मार्गदर्शन केले.

तसेच या कार्यशाळेचे दुसरे वक्ते डॉ. भाऊसाहेब पानगे, एमेरिटस प्रोफेसर, निवृत्त ग्रंथपाल जयकर लायब्ररी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांनी रिसर्च मेट्रिक या विषयावर विद्यार्थ्यांना व संशोधकांना मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ. संजय धर्माधिकारी यांनी विद्यार्थ्यांना पी.एच.डी. करताना येणाऱ्या अडचणीवर मात करण्यासाठी त्यांचा पी.एच.डी. चा प्रवास योग्य दिशेने व्हावा यासाठी या कार्यशाळेचे आयोजन केले.

विद्यार्थ्यांनी, संशोधकांनी, मार्गदर्शकांनी व अनेक ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला. सुमारे ९१ सहभागी विविध ठिकाणांहून या कार्यशाळेसाठी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संदिप माने, ग्रंथपाल IBMRD यांनी केले. या कार्यशाळेसाठी डॉ. मेघा जैन यांनी विशेष परिश्रम घेतले.

आभार प्रदर्शन स्वप्निल नरके यांनी केले. संस्थेचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी व विश्वस्त डॉ. सुजय विखे पाटील, सेक्रेटरी जनरल डॉ. पांडुरंग गायकवाड, मेडिकल कॉलेज व हॉस्पिटलचे संचालक डॉ. अभिजित दिवटे, तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय धर्माधिकारी यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

# हिट्स ऑफ शंकर जयकिशन कार्यक्रमाचे नगरमध्ये २६ ऑक्टोबर रोजी आयोजन

नगर – येथील गायनॅक सोसायटीच्या वतीने संगीतकार स्व.शंकर जयकिशन यांच्या सुरेल गाण्यांची मैफिल २६ ऑक्टोबर रोजी माऊली सभागृह, सावेडी रोड, नगर येथे सायं.६.३० वाजता आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती सोसायटीचे अध्यक्ष डॉ.गणेश बडे, सेक्रेटरी डॉ.अमित करडे यांनी दिली.



या संगीत मैफिलीत स्व. शंकर जयकिशन यांच्या सुमधूर चित्रपट गीतांचा नजराना रसिक प्रेक्षकांना अनुभवायला मिळणार आहे. या कार्यक्रमामध्ये व्हाईस ऑफ मुकेश या नावाने प्रसिद्ध असलेले अहमदाबादचे ॲड. मुख्तार शाह सहभागी होणार आहे. तसेच पुण्याचे गायक विवेक पांडे, सौ.स्वरदा गोडबोले, राजेश्वरी पवार, नगरचे गायक डॉ.सत्तार सय्यद सहभागी होणार आहे.

या कार्यक्रमामध्ये २० वादक कलाकार असणार आहेत. पुणे येथील अमन सय्यद मुझिक ॲरेंजर असणार आहेत. कार्यक्रमाचे निवेदन सौ. निरजा आपटे या करणार आहेत.

या कार्यक्रमाच्या प्रवेशिकांसाठी डॉ.अमित करडे मो. ९८५०२०२६२६, विशाल अरकल मो. ८६६८७०६९३१ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन सोसायटीच्या वतीने करण्यात आले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# ‘क्रेडाई मेगा प्रॉपर्टी एक्स्पो २०२४’ चे १८ ऑक्टोबरला नगरमध्ये उद्घाटन

**एकाच छताखाली १५० हून प्रकल्प, निवांत वातावरणात स्वप्नातील घर निवडण्याची संधी**

नगर – नगरमधील बांधकाम व्यावसायिकांच्या क्रेडाई संघटनेच्या अहमदनगर शाखेने आयोजित केलेल्या क्रेडाई मेगा प्रॉपर्टी एक्स्पो २०२४ ची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर १८ ते २० ऑक्टोबर दरम्यान सदर प्रदर्शन होत आहे. तीन दिवसांचे हे रिअल इस्टेट गृह प्रदर्शन सावेडी रस्त्यावरील सारडा महाविद्यालयाच्या जागेत होणार आहे.

प्रदर्शनाचे उद्घाटन १८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व स्टेट बँक ऑफ इंडियाचे रिजनल मॅनेजर सूर्यनारायण पांड्ये यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती क्रेडाई अहमदनगरचे अध्यक्ष अमित मुथा व सेक्रेटरी प्रसाद आंधळे यांनी दिली.

या उद्घाटन समारंभास खा.निलेश लंके, आ.संग्राम जगताप, क्रेडाई महाराष्ट्रचे अध्यक्ष प्रमोद खैरनार, जिल्हाधिकारी सिध्दराम सालीमठ, पोलिस अधीक्षक राकेश ओला, मनपा आयुक्त यशवंत डांगे, क्रेडाई महाराष्ट्रचे सह सेक्रेटरी आशिष पोखर्णा यांची प्रमुख असणार आहे. प्रदर्शनात १५० हून अधिक स्टॉल्स असणार असून प्रदर्शन सर्वांसाठी खुले आहे. यात बिल्डर्स व डेव्हलपर्सचे सुमारे ४० स्टॉल तसेच बँक्स, होम फायनान्स कंपनी, बांधकाम मटेरियल ट्रेडर्स असणार आहेत.

क्रेडाईची विश्वसनीयता जपत अहमदनगर शाखेने आपल्या सदस्यांचे सर्व रजिस्टर्ड प्रोजेक्टस् एकाच



बांधकाम व्यावसायिकांच्या क्रेडाई संघटनेच्या अहमदनगर शाखेतर्फे १८ ऑक्टोबर रोजी नगरमध्ये होणाऱ्या प्रदर्शनाची तयारी अंतिम टप्प्यात आली असल्याचे छायाचित्रात दिसत आहे.

छताखाली ग्राहकांना उपलब्ध व्हावेत यासाठी या तीन दिवसीय प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. दिवाळीसारख्या मोठा सण साजरा होणार आहे. अशा काळात हक्काच्या घराची स्वप्नपूर्ती करता यावी यासाठी क्रेडाईने पुढाकार घेतला आहे.

प्रदर्शनात पुण्यातील निवडक बिल्डर्सचेही प्रकल्प असणार आहे. त्यामुळे पुण्यातील प्रकल्पांतही नगरकरांना खरेदी करता येणार आहे.

तीन दिवसीय प्रदर्शनात दररोज लकी ड्रॉ काढण्यात येणार असून प्रदर्शनास भेट देणाऱ्यांना आकर्षक बक्षिसे जिंकण्याची संधी असेल. याशिवाय विविध मनोरंजनाचे कार्यक्रम, फूड कोर्ट असल्याने ग्राहकांना सहकुटुंब निवांत वातावरणात आपल्या आवडीनुसार घराचे बुकिंग करता येणार आहे.


प्रत्येक स्टॉल प्रशस्त व अत्याधुनिक सोयी सुविधांसह सुसज्ज असल्याने ग्राहकांना अतिशय निवांत वातावरणात आपल्या स्वप्नातील घराची निवड करता येणार आहे. प्रदर्शनस्थळी बँका, गृह कर्ज देणाऱ्या फायनान्स कंपन्यांचे स्टॉल्सही असणार आहेत. बजेट होम, लक्झुरियस घरे, ट्विन बंगलो, अपार्टमेंट, अंतिम मंजुरीचे प्लॉट ले आऊट, कमिर्शियल कॉम्प्लेक्सचे प्राजेक्ट, फार्म हाऊस, एन.ए. प्लॉट एकाच छताखाली उपलब्ध होणार आहेत.

याशिवाय प्रथमच बांधकाम मटेरियल सप्लायर्स व बांधकामाशी निगडित लिफ्ट, स्टील, इंटेरियर मटेरियलचेही स्टॉल प्रदर्शनात असणार आहे. १० लाखापासून ते २.५० कोटींपर्यंतची घरे, फ्लॅटचे प्रोजेक्ट याठिकाणी असणार आहे. अतिशय योग्य व रास्त दरात पारदर्शी व्यवहारासह दर्जेदार, स्वप्नातील घराच्या पूर्ततेचा आनंद या प्रदर्शनातून ग्राहकांना मिळणार आहे.

या प्रदर्शनाची नियोजन व्यवस्था क्रेडाई अहमदनगरचे प्रेसिडेंट इलेक्ट गिरीश अग्रवाल, उपाध्यक्ष अमित वाघमारे व सागर गांधी, खजिनदार दीपक बांगर, माजी अध्यक्ष संजय गुगळे, आशिष पोखर्णा, विक्रम जोशी, आर्किटेक्ट मयुर कोठारी, प्रकाश मेहता, कमलेश झंवर, ॲड.जयवंत भापकर आदींसह सर्व सदस्य पाहत आहेत.

# राज्य जैन समाज अल्पसंख्याक महामंडळाच्या व्हा. चेअरमनपदी मितेश नाहाटा यांची नियुक्ती

नगर – राज्यातील महायुती सरकारने राज्यात नव्याने स्थापन झालेल्या महाराष्ट्र राज्य जैनसमाजअल्पसंख्यांक महामंडळाच्या प्रथम पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केल्या आहेत. यामध्ये महामंडळाच्या प्रथम व्हाईस चेअरमन पदी श्रीगोंदा तालुक्यातील लोणी व्यंकनाथ येथील मितेश नाहाटा यांची नियुक्ती करण्यात आली आहे, अशी घोषणा मुख्यमंत्री सचिवालयातून करण्यात आली आहे. मितेश नाहाटा हे समाज भूषण स्व.बन्सीलाल नाहाटा यांचे नातू आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे बाळासाहेब नाहाटा यांचे चिरंजीव आहेत.



मितेषकुमार नहाटा यांची महाराष्ट्र राज्य जैन समाज अल्पसंख्यक महामंडळाच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल राष्ट्रवादी कांग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सत्कार करून अभिनंदन केले.

उपमंत्री पदाचा दर्जा असलेल्या राज्यातल्या या महत्त्वाच्या पदावर मितेश नाहाटा यांच्या नियुक्तीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शिफारस केली होती. त्यानुसार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ही नियुक्ती केली आहे. या नियुक्तीनंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मितेश नाहाटा यांचा सत्कार करून अभिनंदन केले आहे.

मितेश नाहाटा यांनी लोणी व्यंकनाथ गावचे ५ वर्ष उपसरपंचपद सांभाळल्यानंतर त्यांना राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश युवाच्या उपाध्यक्ष पदाची जबाबदारी तसेच पक्षाचे ठाणे शहराचे निरिक्षक म्हणून अजित पवार यांनी जबाबदारी दिली आहे. अनेक सामाजिक उपक्रमांमध्ये मितेश नाहाटा यांचा हिरीरीने सहभाग असतो. कोरोना काळात ग्रामीण भागातील रुग्णांसाठी सुरु केलेल्या कोविड केअर सेंटरमध्ये हजारो नागरिकांनी उपचार घेतले होते. या कोविड केअर सेंटरचे क्रिकेटपटू ऋतुराज गायकवाड यांनी कौतुकही केले होते.

लोणी व्यंकनाथ गावचे बाळासाहेब नाहाटा यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महाराष्ट्र राज्य बाजार समिति महासंघाच्या अध्यक्षपदी व महाराष्ट्र राज्याच्या कृषी आणि पणन महामंडळावर संचालक म्हणून काम करण्याची संधी दिली आणि आता हे दुसरे राज्य पातळीवरचे पद मितेश नाहाटा यांना दिल्यामुळे आपल्या लोणी व्यंकनाथ गावचे नाव महाराष्ट्राच्या नकाशावर झळकले आहे.



नवरात्रीनिमित्त रांगोळी स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळविलेल्या ग. ज. चितांबर विद्या मंदिरची विद्यार्थिनी कु. श्रावणी वेदपाठक हिचा सत्कार करताना अध्यक्ष डॉ. रविंद्र साताळकर. समवेत निलेश वैकर, मुख्याध्यापिका सौ. विभावरी रोकडे आदी.

## चितांबर विद्या मंदिरची श्रावणी वेदपाठक रांगोळी स्पर्धेत विजयी

नगर – आमदार संग्रामभैया जगताप सोशल फाउंडेशनच्या वतीने नवरात्रीनिमित्त रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये महर्षी ग.ज. चितांबर विद्या मंदिर ची इयत्ता १२ वीची विद्यार्थिनी कु. श्रावणी गणेश वेदपाठक हिने जागर स्त्री शक्तीचा हा विषय घेऊन कोल्हापूरच्या अंबाबाईचे रांगोळी मध्ये असे चित्र रेखाटले. या स्पर्धेत तिने ५,५५५ रुपयाचे तृतीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. तिचा रोख रक्कम व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

श्रावणीचे या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. रवींद्र साताळकर, सचिव निलेश वैकर, विद्यालयाच्या प्राचार्या सौ. विभावरी रोकडे, पर्यवेक्षिका श्रीमती शिंदे व सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले. तिने मिळवलेल्या या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# मेहेरबाबांच्या स्मृतीप्रित्यर्थ निघालेल्या नवजीवन पदयात्रेचे शहरात स्वागत

**लाल बावटा संलग्न अवतार मेहेरबाबा कामगार युनियनच्या वतीने भाविकांना फळांचे वाटप**

नगर – समर्पण, आत्मत्याग व मानवतेच्या सेवेचा संदेश देणाऱ्या अवतार मेहेरबाबांच्या स्मृतीप्रित्यर्थ ७५ व्या नवजीवन पर्वाच्या स्मरणार्थ नवजीवन पदयात्रा काढण्यात आली. अवतार मेहेरबाबा अहमदनगर केंद्राच्या वतीने काढण्यात आलेल्या या नवजीवन पदयात्रेचे शहरात लाल बावटा संलग्न अवतार मेहेरबाबा कामगार युनियनच्या वतीने स्वागत करुन भाविकांना फळांचे वाटप करण्यात आले. चाणक्य चौकात यात्रेचे स्वागत करुन घोड्यांच्या रथामध्ये असलेल्या अवतार मेहेरबाबांच्या प्रतिमेस भाकपचे राज्य सचिव कॉ. ॲड. सुभाष लांडे व लाल बावटाचे जिल्हा सचिव कॉ. ॲड. सुधीर टोकेकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.



मेहेरबाबांच्या स्मृती प्रित्यर्थ निघालेल्या नवजीवन यात्रेचे नगर शहरात लाल बावटा संलग्न अवतार मेहेरबाबा नगर केंद्राच्यावतीने स्वागत प्रसंगी फळे वाटप करताना कार्यकर्ते.

यावेळी कामगार युनियनचे युनिट अध्यक्ष कॉ. सतीश पवार, उपाध्यक्ष संजय कांबळे, विजय भोसले, सुभाष शिंदे, हरिष पाटोळे, तुषार शेलार, अजित बोराटे, सुनिता जावळे, अशोक दळवी, राम कल्हापुरे आदींसह युनियनचे सदस्य उपस्थित होते.

संस्थेचे विश्वस्त मेहेरनाथ कलचुरी, रमेश जंगले व राजू प्रसाद यांनी कामगार युनियनच्या वतीने दरवर्षी करण्यात येणाऱ्या यात्रेच्या स्वागत उपक्रमाचे कौतुक केले. अवतार मेहेरबाबांनी १६ ऑक्टोबर १९४९ रोजी नवजीवन यात्रेला प्रारंभ केला होता. या घटनेच्या ७५ व्या वर्षाच्या स्मृतीप्रित्यर्थ सरोष टॉकीज येथील मेहेर सेंटर येथून या पदयात्रेचा प्रारंभ झाला.

ही पदयात्रा अरणगाव मेहेराबाद येथे मेहेरबाबांच्या समाधी स्थळी समारोप झाला. यामध्ये जिल्ह्यासह परदेशातील भाविक मेहेरबाबांचा जयघोष करीत सहभागी झाले होते.

# स्त्रियांना नारी शक्ती बरोबरच आदिशक्तीचे रूप

**जयश्री डावरे यांचे प्रतिपादन**

नगर – हिंदू धर्म हा जगातील एकमेव प्रमुख धर्म आहे स्त्री देवत्याच्या रूपात देवाच्या उपासनेवर भर देतो स्त्रीला आदिशक्ती माता देवी म्हणून ओळखले जाते नवरात्र उत्सवात नऊ दिवस व्रत करून स्त्रिया ह्या जीवन आणि प्रेमाचे सार दर्शविते अशा या नारी शक्तीचा सन्मान कोजागिरी पौर्णिमेला करण्याचा स्नेह ७५ चा संकल्प पूर्ण झाला, असे प्रतिपादन जयश्री डावरे यांनी केले.

सावेडीत विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणार्या नारींचा सन्मान स्नेह ७५ च्या वतीने करण्यात आला. कन्या पूजन व नारी शक्तीचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. अस्मिता अष्टेकर इंटीरियर डिझायनर झेबा शेख, पूजा पवार, कु.सई, कु. ध्रुवी, रजनी ढोरजे आदींसह स्नेह ७५ चे सदस्य उपस्थित होते.

जयश्री डावरे पुढे म्हणाल्या, स्त्रिया या शांत, संयमी, सहनशीलता अशा स्वभावाच्या असतात मात्र अन्याय अत्याचार होत असेल तर त्यांचे रौद्ररूप पहावयास मिळते मात्र तिच्या दैवी शक्ती पुढे कोणी टिकत नाही अशा या नारीचे रूप नवरात्र उत्सवात विविध दैवी रूपात पाहायला मिळते.



कोजागिरी पौर्णिमेला नारींचा सन्मान व कन्या पूजनाने झाली. स्नेह ७५ च्या वतीने डॉ.अस्मिता अष्टेकर इंटीरियर डिझायनर झेबा शेख, पूजा पवार यांचा सत्कार कु.सई, कु.ध्रुवी यांचे कन्या पूजन करण्यात आले. याप्रसंगी रजनी ढोरजे, जयश्री डावरे उपस्थित होते. (छाया – विजय मते)

**स्नेह ७५ चे वतीने कन्या पूजन व नारी शक्ती सन्मान**

स्नेह ७५ च्या वतीने डॉ. अस्मिता अष्टेकर यांच्या होमिओपॅथिक रुग्णालयातून सर्वसामान्य लोकांना सेवाभावी वृत्तीने सेवा देतात. अरणगाव येथील मेहरबाबा ट्रस्टच्या दवाखान्यात सेवा सुरू आहे. इंटीरियर डिझायनर पूजा पवार, झेबा शेख यांनी देखील सुट्टीच्या कालावधीत मुलींना स्त्रियांना आपल्या कला कौशल्याचा उपयोग कसा करून देता येईल, त्यासाठी प्रयत्नशील राहतात अशा या महिलांचा सन्मान करण्याचा मानस असल्याचे प्रास्ताविकात ईश्वर सुराणा यांनी सांगितले.

यावेळी डॉ. प्रवीण रानडे, डॉ. शशिकांत उदास, सागर अष्टेकर, दिलीप डावरे, किशोर रेणाविकर, अनिल चाबुकस्वार, दिलीप अकोलकर, धनेश बोगावत, शैलेंद्र गांधी, विजय संकलेचा उपस्थित होते. गुलाब गोरे यांनी आभार मानले.

# खडतर प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर प्रा.डॉ.पोपट पठारे यांना लेफ्टनंट रँक

नगर – १७ महाराष्ट्र बटालियन NCC अहिल्यानगरचे एनसीसी युनिट श्री मुलिकादेवी महाविद्यालय निघोज ता. पारनेर येथे एन.सी.सी. विभागात कार्यरत असणारे प्रा.डॉ.पोपट पठारे यांनी ऑफिसर ट्रेनिंग अकॅडमी कामठी नागपूर येथून सहयोगी एनसीसी अधिकारी या पदाकरिताचे तीन महिन्यांचे खडतर प्रशिक्षण पूर्ण करून लेफ्टनंट ही रँक मिळवली.



१७ महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग अधिकारी कर्नल चेतन गुरुबक्ष, ले.कर्नल रणदिप सिंग यांनी डॉ. पठारे यांना सन्मानित केले. लेफ्टनंट पोपट पठारे यांनी महाराष्ट्रातील ऑफिसर ट्रेनिंग अकादमीमधून कठोर लष्करी प्रशिक्षण घेतले आणि ऑक्टोबर २०२४ मध्ये लेफ्टनंटची रँक प्राप्त केली. महाविद्यालयाचे प्राचार्य, व्यवस्थापन यंत्रणा आणि NCC कॅडेट्स देखील त्यांना एक आदर्श ANO मानतात. प्रशिक्षणानंतर महाविद्यालयात परतल्यावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.के.आहेर यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

महाविद्यालयासाठी ही अभिमानाची बाब असल्याचे ते म्हणाले, प्रा. डॉ. पठारे हे तीन महिन्यांच्या प्रशिक्षणानंतर लेफ्टनंट म्हणून परतले आहेत. त्यांच्या यशस्वी पूर्ततेबद्दल महाविद्यालय व्यवस्थापन समितीचे सदस्य तसेच अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर संस्थेचे सचिव विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव जयंतराव वाघ यांनी प्रा. डॉ.पी.पी. पठारे यांचे अभिनंदन केले.



अनामप्रेम संस्थेतर्फे ‘जागतिक पांढरी काठी’ दिनानिमित्त अजय धोपावकर यांचा अनामप्रेम अध्यक्ष इंजि.अजित माने यांच्या हस्ते पांढरी काठी देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी अभय रायकवाड, अमृत भुसारी, चेतन लांडगे सह अनामप्रेम परिवारातील सदस्य उपस्थित होते.

## अंधांच्या जीवनातील 'पांढरी काठी' हा तिसरा डोळा

**इंजिनिअर अजित माने यांचे प्रतिपादन**

नगर – अंध व्यक्तीच्या आयुष्यात ‘पांढरी काठी’ ही तिसरा डोळा म्हणून काम करते अंधाने स्वतःला कमजोर न समजता आपल्यातले उपजत गुण ओळखून जीवनाकडे सकारात्मकतेने पाहावे व जीवनात यशस्वी व्हावे सर्व विद्यार्थ्यांच्या पाठीमागे अनामप्रेम संस्था सतत उभी राहील, असे प्रतिपादन अनामप्रेम संस्थेचे अध्यक्ष इंजि.अजित माने यांनी केले.

अनामप्रेम संस्थेतर्फे ‘जागतिक पांढरे काठी’ दिवस साजरा करण्यात आला यावेळी अजित माने बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार व अंध धावपटू अजय धोपावकर उपस्थित होते. श्री. माने म्हणाले अंध विद्यार्थी जिद्द चिकाटी व आत्मविश्वासाच्या जोरावर विविध क्षेत्रात समजदार कामगिरी करीत आहे. त्यांनी नियमितपणे अभ्यास करून आपल्या क्षेत्रात यशस्वी व्हावे, अनामप्रेम संस्था त्यांना सर्वतोपरी मदत करेल.

अजय धोपावकर म्हणाले मला वयाच्या ४४ व्या वर्षी अचानक अंधत्व आले. या संकटावर मात करण्यासाठी अनामप्रेम संस्थेचा मोठा आधार मिळाला त्यामुळे पुढे अंध असतानाही १५ मॅरेथॉनमध्ये सहभाग घेऊ शकलो. माझ्या जीवनात पांढऱ्या काठी मुळे दिशा व परिवर्तन होण्यास मदत झाली.

अनामप्रेमचे विद्यार्थी शुभम राऊत व द्वारका जोरवर यांची यावेळी भाषणे झाली. सूत्रसंचालन वसतिगृह प्रमुख अमृत भुसारी यांनी केले चेतन लांडगे यांनी आभार मानले. अनामप्रेम संस्थेचे अभय रायकवाड, राहुल खिरोडे, प्रकाश गजे, पल्लवी मकासरे, विद्या वारे व उमेश पंडूरे हे यावेळी उपस्थित होते.

# डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फार्मसीमध्ये ‘नेकी की दीवार’ हा सामाजिक उपक्रम

**एक हात मदतीचा जुन्या कपड्याचे दान, गरीबांसाठी वरदान**

नगर – ‘जुन्या कपडय़ांचे दान, गरिबांसाठी वरदान’ हे ब्रीद घेऊन डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनचे फार्मसी कॉलेज, अहिल्यानगर व क्लाथ फौंडेशन क्लब खास सामाजिक कामाच्या माध्यमातून गरिबांचा दुवा घेण्याचे काम करीत आहे. आपल्याला नको असलेले जुने कपडे हे दान म्हणून स्वीकारून ते वंचित दुर्बल घटकातील गरजूंपर्यंत पोहोचविण्याचे काम डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनचे फार्मसी कॉलेज अहिल्यानगर व क्लाथ फौंडेशन क्लब अंतर्गत सुरू आहे.




डॉ विठ्ठलराव विखे पाटील फार्मसीमध्ये ‘नेकी की दीवार’ या सामाजिक उपक्रमांतर्गत उपक्रम प्रसंगी एक हात मदतीचा जुन्या कपड्यांचे दान गरिबांना देताना प्राचार्य डॉ. पी. वाय. पवार आदी.

हे काम जलदगतीने होण्यासाठी आपल्या सारख्या समाज सेवक, दानशूर दानदात्यांच्या माध्यमातून क्लाथ फौंडेशन क्लब कार्यरत आहे. आपल्या सर्वांच्या माध्यमातून अनाथ निराधार मुला मुलींना जुने नवीन कपडे वाटप करण्यात येणार आहेत. आपण जमा केलेले जुने कपडे, शैक्षणिक साहित्य इत्यादी घेऊन ते गरजूंपर्यंत पोहोचविण्याचे काम विखे पाटील फौंडेशन व क्लाथ फौंडेशन क्लबच्या माध्यमातून करीत आहोत.

नेकी की दीवार ह्या कार्यक्रमाचे महत्व विशद करताना प्राचार्य डॉ.पी.वाय. पवार म्हणाले की महाविद्यलयात शैक्षणिक उपक्रमांबरोबरच सामाजिक उपक्रमाचे देखील विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत अनन्यसाधारण महत्व आहे. त्यानुषंगाने सदर उपक्रमांतर्गत ‘तुम्हाला नको ते आम्हाला द्या, आम्ही ते गरजूंपर्यंत पोचवू’ या तत्त्वावर सेवाभावी वृत्तीने हे काम चालते. या उपक्रमाला गती मिळावी म्हणून आज प्रातिनिधिक स्वरूपात महाविद्यलयत ह्याचे उदघाटन प्राचार्य डॉ.पी.वाय. पवार, उपप्राचार्य डॉ.आर.एल.सावंत, विभागप्रमुख प्रा.डॉ.एस.झेड.चेमटे आणि सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यर्थी ह्या प्रसंगी उपस्थित होते.

‘तुम्हाला नको ते आम्हाला द्या, आम्ही ते गरजूंपर्यंत पोचवू’ या तत्त्वावर सेवाभावी वृत्तीने हे काम करत आहोत. ताई दादा आपल्या माध्यमातून ‘सामान्य जनांना आनंद मिळू दे, उत्तम वस्त्रे परिधान करू दे! तुमची नको असलेली वस्त्रे त्यांच्यासाठी शान ठरू दे!’. अशा शब्दांत संस्थेचे अध्यक्ष व विश्वस्त राधाकृष्ण विखे पाटील व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील, संस्थेचे सेक्रेटरी जनरल डॉ. पांडुरंग गायकवाड, मेडिकल कॉलेज व हॉस्पिटलचे संचालक डॉ. अभिजित दिवटे यांनी उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. या उपक्रमासाठी विखे पाटील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यलयातील विद्यर्थी विकास अधिकारी प्रा.डॉ. गणेश गोडगे आणि कमवा आणि शिका उपक्रमातील सर्व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

इच्छुक नागरिकांनी वस्तूच्या देणगीसाठी आमचे विद्यार्थी सुरज काळे ७००२३००९८४, रोहन कुमकर ८०८०८५९१६९, वैभव निमसे ९५६११४३७५१ आणि रोहन सुरूशे ७०८३०७४२५२ ह्यांच्याशी संपर्क करावा असे आवाहन प्रा.डॉ. गणेश गोडगे ह्यांनी केले.

# धम्माल मनोरंजन

## सुविचार



इतरांच्या आनंदाशी समरस होऊन सुखपुर्ण गीत गाणारे दु:खी हृदय हे उदात्ततेचे सर्वांत उत्तुंग शिखर आहे.

तात्पर्य : आपण आनंदी असावे, सुखी असावे, आपल्याला कधीही दु:ख प्राप्त होऊ नये म्हणून प्रत्येक जण धडपड करतो. ही धडपड त्याने करावी, परंतु आपल्याला झालेले दु:ख विसरुन जो इतरांच्या सुखात मनोमन सहभागी होतो, तो खरा सुखी. त्याचाच आदर्श इतरांनी घ्यावयास पाहिजे.

## दिनविशेष १८ ऑक्टोबर२०२४

१८०४: थायलंडचा राजा मोंगकुट ऊर्फ राम (चौथा) यांचा जन्म. (मृत्यू: १ ऑक्टोबर १८६८)

१८६१: न्यायाधीश, कायदेपंडित, लेखक भारताचार्य' चिंतामणराव वैद्य यांचा जन्म. (मृत्यू: २० एप्रिल १९३८)

१९२५: नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा (छडऊ) चे संचालक इब्राहिम अल्काझी यांचा जन्म.

१९२५: अल्बेनिया देशाचे पहिले अध्यक्ष रमीझ अलिया यांचा जन्म. (मृत्यू: ७ ऑक्टोबर २०११)

१९३९: राष्ट्राध्यक्ष जॉन एफ. केनेडीचा मारेकरी ली हार्वे ओस्वाल्ड यांच जन्म. (मृत्यू: २४ नोव्हेंबर १९६३)

१९५०: अभिनेता ओम पुरी यांचा जन्म.

१९५६: झेकोस्लोव्हाकियाची लॉन टेनिस खेळाडू मार्टिना नवरातिलोव्हा यांचा जन्म.

१९६५: इस्लामिक रिसर्च फाउंडेशन (आयआरएफ) चे संस्थापक आणि अध्यक्ष झाकीर नाईक यांचा जन्म.

१९७४: भारतीय लेखक अमिश त्रिपाठी यांचा जन्म.

१९७७: भारतीय अभिनेता कुणाल कपूर यांचा जन्म.

१९८४: भारतीय अभिनेत्री फ्रीडा पिंटो यांचा जन्म.

१८ ऑक्टोबर– मृत्यू

१८७१: पहिल्या यांत्रिकी संगणकाचे जनक चार्ल्स बॅबेज यांचे निधन. (जन्म: २६ डिसेंबर १७९१)

१९०९: देशभक्त, काँग्रेसचे १६ वे अध्यक्ष लालमोहन घोष यांचे निधन. (जन्म: १७ डिसेंबर १८४९ – कलकत्ता)

१९३१: अमेरिकन संशोधक आणि उद्योजक थॉमस अल्वा एडिसन यांचे निधन. (जन्म: ११ फेब्रुवारी १८४७)

१९५१: पहिल्या स्त्री नाटककार, गायिका, संगीतकार हिराबाई पेडणेकर यांचे निधन. (जन्म: २२ नोव्हेंबर १८८५)

१९७६: भारतीय कवी आणि लेखक विश्वनाथ सत्यनारायण यांचे निधन. (जन्म: १० सप्टेंबर १८९५)

१९८३: क्रिकेटपटू विजय मांजरेकर यांचे निधन. (जन्म: २६ सप्टेंबर १९३१)

१९८७: कम्युनिस्ट कार्यकर्ते वसंतराव तुळपुळे यांचे निधन.

१९९३: भारतीय चित्रपटसृष्टीतील पहिल्या बालअभिनेत्री मंदाकिनी विश्वनाथ आठवले यांचे निधन.

१९९५: छायालेखक ई. महमद यांचे निधन.

२००४: चंदन तस्कर वीरप्पन यांचे निधन. (जन्म: १८ जानेवारी १९५२)

## बोधकथा

एका शहरात दोन मोठे व्यापारी होते. ते दोघेही चांगले मित्र होते. एकाचे नाव धनदास तर दुसऱ्याचे नाव रामदास. पण धनदास फार स्वार्थी होता. तो लबाडही होता.

एकदा रामदास शेटने हजार पोती गहू खरेदी केला. पण त्याला तो ठेवायला जागा नव्हती. म्हणून त्याने ती सर्व पोती धनदास शेटच्या गोदामात भरली. चार सहा महिने झाल्यावर धनदासने तो गहू गुपचुप विकून टाकला व रुपये घेऊन गडप केले.

पुढे एके दिवशी रामदास शेठ धनदास शेठकडे आला व म्हणाला, 'मित्रा, मी तो गहू आता विकला आहे. तर गोदाम उघड. मी तो घेऊन जाते.'

धनदास म्हणाला, 'कसला गहू, कोणाचा गहू? माझ्याकडे कुणाचा गहू नाही.'

रामदास शेठने ओळखले की, याने आपला विश्वासघात केला आहे. आपला गहू याने हडप केला. आपणाला याने फसविले. रामदास शेठने धनदास शेठवर न्यायालयात फिर्याद केली.

धनदास शेठ कोर्टात हजर झाले आणि न्यायाधीशांना म्हणाला, 'महाराज, रामदास शेठने माझ्याकडे गहू ठेवलाच नाही. ते खोटेच सांगत आहेत.'

पण न्यायाधीश फार हुशार होते. त्यांनी थोडा वेळ विचार केला व म्हणाले, 'ठीक आहे. मीही रामदास शेठना सांगितले की, तुमचा गव्हाचा आरोप सिद्ध होणार नाही. आता थोडे फार मिळेल त्याच्यावरच समाधान माना. तुम्ही गहु नका देऊ पण त्या गव्हाची हजार पोती तरी द्याल की नाही. तेवढ्यावरच मिटेल हा तंटा.'

धनदास म्हणाला, 'न्यायाधीश महाराज, मग हे त्यांनी आधीच कां नाही सांगितले. मी ती पोती कधीच देऊन टाकली असती. सुरक्षित ठेवली आहेत ती सगळी. ती पोती मी केव्हाही द्यायला तयार आहे.'

न्यायाधीशांनी धनदासचे हे शब्द ऐकले. धनदासकडे रामदासने गहू ठेवले होते हे यावरुनच सिद्ध झाले. न्यायाधिशांनी धनदासला कडक शिक्षा ठोठावली.

**बोध** : शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ.

## विनोद

शेवंताबाईंना आपल्या कुत्र्याचा फार अभिमान. त्याच्याबद्दल त्या तास न् तास बोलत असत. एक दिवस त्या रमाकाकुंना आपल्या कुत्र्याची स्तुती ऐकवत होत्या. 'मी सांगते तुम्हाला, आमचा टिपू काही अल्सेशियन नाही. पण सांगते ना, आमच्या दारासमोर कुणीही भिकारी किंवा अनोळखी माणूस उभा राहिला की त्याला लगेच कळतं आणि मग क्षणाचाही विलंब न लावता तो आम्हाला कळवतो.'


'म्हणजे? करतो तरी काय तो?'

'ओळखा की.'

'भुंकुन भुंकुन घर डोक्यावर घेतो वाटतं?'

'छी पक्का आहे, अहो हळूच सरपटत सरपटत येतो आणि शेपूट खाली पाडून सोफ्याखाली जाऊन बसतो.

## शब्दरंजन



### आडवे संकेत

१) शांत, नीरव
३) दोषी, गुन्हेगार
७) नाशिवंत
८) म्युनसिपल कार्पोरेशनचे मराठीत
१०) गोंधळ, थट्टा
११) बहिणीचा नवरा
१२) कड, बाजू
१४) गाढव १५) दुध
१६) लांबत जाणारे काम
२२) हट्ट धरुन बसलेला
२३) प्रभातकाळी लवकर
२४) ओढा, प्रवृत्ती
२५) मंचक, माचा
२७) ति व ला चे अक्षरबदल
२८) डौल, नखरा
३०) इंग्रजीत बकरी
३१) चुकणे, निभावणे
३२) लेकरास होणारी ओकारी
३५) एक तृणधान्य
३६) यज्ञ, पूजा
३८) वेष्टलेले
४१) मदत, टेकू
४३) शिकार करणारा
४४) नाण्याची एक बाजू
४५) गवताच्या बारीक काड्या
४७) इच्छा ४९) एक मराठी हिरो
५२) लहान पुडा
५३) दुर्ग, किल्ला
५४) फवारा
५५) धान्याचे तुकडे

### उभे संकेत

१ लिहिता वाचता येणारा
२) माशाची एक जात
३) टॅक्स
४) बॉर्डरचा एक हिरो
५) मस्ती
६) दुपारच्या जेवणानंतरची अल्प निद्रा
८) नटलेला
९) रानटी
१३) निवड न करता
१६) नमुना
१७) व्यत्यय
१८) थोडे-थोडे
१९) जाग
२०) शेक, वेळू, बांबू
२१) थोडे पातळ शौचास होणे
२२) नीच, पाजी
२४) विठ्ठलाचे वर्णन विटेवरी पाय
२६) लहानपणाचा मित्र
२९) लाकडापासून तयार केलेला
३३) धावणारा
३४) मनातील विचार
३५) वास्तव्य
३७) एक प्राणी
३९) सुटलेले केस
४०) वीट, शिसारी
४२) संस्कृत भाषेत पौर्णिमा
४६) एक आडनाव
४७) लहान मळा
४८) मोठा काळा साप
५०) भाकर
५१) बूड, खालचा भाग

### कालचे उत्तर


| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पा | र | धी | | अं | द | मा | न | नि | को | बा | र | |
| र | म | | अं | त | र्या | मी | | ब | ळ | | वा | स |
| ख | ल | ब | त | | पू | | द | र | सा | ल | | र |
| | | हु | | | र | | म | | | क | ल | प |
| गो | ळा | बे | री | ज | | आ | ट | पा | ट | | ग | ट |
| मा | | ग | त | का | ळ | | | ख | र | च | ट | णे |
| ग | र | म | | त | | क | च | र | ट | | | |
| णे | | | सु | दा | मा | | ढ | | र | ज | नी | |
| श | शि | शे | ख | र | | दे | ऊ | ळ | | म | ल | म |
| | ख | | के | | स | र | ता | ज | | | क | रु |
| अ | र | क | स | | र्व | | र | म | त | ग | म | त |
| र | ण | | ब | द | ना | म | | खा | ट | | ल | |
| ब | | गो | | | श | र्मी | या | ना | | | | |




## अनेक शब्दापासून एक शब्द

- वार्धक्यामुळे झालेला बुद्धीभ्रंश –**म्हातारचळ**
- पोरबुद्धीने वागणारा –**पोरकट**
- तिथी, काळ, नक्षत्र, योग व करण अशी दिवसाच्या पाच अंगांची माहिती देणारे –**पंचांग**
- पुर्वेकडे तोंड करुन असलेला –**पुर्वाभीमुखी**
- पश्चिमकडे तोंड करुन असलेला –**पश्चिमाभीमुख**
- ज्या कुणीही नाही असा –**अथाथ**
- जिचा पती मृत्यू पावला आहे अशी –**विधवा**
- ज्याची पत्नी मृत्यू पावली आहे असा –**विधूर**
- ज्याने लग्न केले नाही असा –**अविवाहित**
- १५ दिवसांचा कालावधी –**पंधरवाडा**
- ठरविक काळाने प्रकाशित होणारे –**नियतकालीक**
- दर तीन महिन्यांनी प्रकाशित होणारे –**त्रेयमासिक**
- प्रती वर्षी प्रकाशित होणारे –**वार्षिक**
- तांब्याचा पत्रावर कोरलेला लेख –**तांम्रपट**
- दगडावर कोरलेला लेख –**शिलालेख**
- अतिशय उंच –**अत्युच्च**
- सर्वात उंच –**सर्वोच्च**
- एक धर्म सोडून दुसरा धर्म स्वीकारणे –**धर्मांतर**
- एक देश सोडून दुसऱ्या देशात जाणे –**देशांतर**
- वेश बदलणे –**वेशांतर**
- व्यभिचारी स्त्री –**व्यभिचारीनी**
- दुसऱ्यावर अवलंबून असणारा –**परावलंबी**
- स्वतःच्या पायावर उभा राहणारा –**स्वावलंबी**
- सपुर्ण शरीरभर किंवा पायाच्या नखापासून शेंडीपर्यंत –**नखशिखांत**
- संपूर्ण शरीरभर किंवा पायापासून डोक्यांपर्यंत –**अपादमस्तक**
- घरदार नसलेला –**बेघर**
- ज्याला कुणीही जिंकू शकले नाही –**अजिंक्य**
- जे विसरता येणार नाही असे –**अविस्मरणीय**
- दगडावर केलेले सुंदर कोरीव काम –**शिल्पकृती**
- सुटकेच्या भावनेने सोडलेला दीर्घ श्वास –**निःश्वास**
- दुःखाच्या भावनेने सोडलेला दीर्घ श्वास –**सुस्कारा**
- पुर्वेकडिल देशामधील लोक –**पौर्वात्य**
- पश्चिम देशाकडील लोक –**पश्चिमात्य**
- सापांचा खेळ करणारा –**गारुडी**
- अस्वलांचा खेळ करणारा –**दरवेशी**
- माकडांचा खेळ करणारा –**मदारी**
- सतत उद्योग मग्न असणारा –**उद्योगशील**
- चारित्र्यावर काहीही ठपका नसणारा –**निश्कलंक**
- कठोर हृदयाचा –**पाषाणहृदयी**
- शत्रुपक्षात सामील झालेला –**फितूर**
- देशासाठी बलिदान केले आहे असा –**हुतात्मा**
- दुपारच्या भोजनानंतरही अल्पशी निद्रा –**वामकुक्षी**
- डाव्या कुशीवरील अल्पशी निद्रा –**वामकुक्षी**
- जनावरे मोफत पोसण्याचे ठिकाण –**पांजरपोळ**
- समाजातील इतरांना उपद्रव देणारे लोक –**समाजकंटक**
- ज्याला वाळीत टाकले आहे असा –**बहिष्कृत**
- सतत एकटे राहण्याची आवड असलेला –**एकलकोंडा**
- राजाची स्तुती करणारा –**भाट**
- जुनी रुढी– परंपरा यांचे काटेकोर पालन करणारा –**सनातनी, कर्मठ**
- बुद्धीप्रमाणे मानुन त्याप्रमाणे वागणारा –**बुद्धीप्रामाण्यवादी**
- कष्टकरुन जगणारा –**श्रमजीवी**
- डोक्यावरुन ओझे वाहून नेणारा –**माथाडी**
- बुद्धीची कामे करुन निर्वाह करणारा –**बुद्धीजीवी**
- ज्याचे हात गुडघ्यापर्यंत लांब आहेत असा –**आजानुबाहू**
- अचानक आलेला –**अगांतूक**
- शेतातून जाणारी अरुंद पायवाट –**पाणंद, पाळंद**
- शिकवल्याप्रमाणे बोलणे –**पोपटपंची**
- उंटावरुन टपाल नेणारा –**सांडनीस्वार**
- नसलेली गोष्ट आहे असे वाटणे –**आभास**
- जेथे दोन नद्या एकत्र मिळतात ते ठिकाण –**संगम**
- जेथे तीन नद्या एकत्र मिळतात ते ठिकाण –**त्रिवेणीसंगम**
- कसलीही अपेक्षा नसणारा –**निरपेक्ष**
- जेथे आभाळ जमीनीला टेकल्यासारखे वाटते ती जागा–**क्षितीज**
- कधीही नष्ट न होणारे –**शाश्वत**
- न समजणारे –**अगम्य**

## फिल्मीरंजन



### आडवे संकेत

१) सन १९८९ मध्ये बनलेल्या 'प्रेम प्रतिज्ञा' या चित्रपटाचा नायक.
३) की जीत (चित्रपट)
६) कुछ खट्टी मिठी (चित्रपट)
७) सन १९९० मध्ये कल्पतरु दिग्दर्शीत या चित्रपटात मिथून चक्रवर्ती, मिनाक्षी शेषांद्री आणि कादर खान होते.
८) दिल क्या (चित्रपट)
९) प्यार हो गया (चित्रपट)
१०) लागू (सहनायीका)
१२) नितीश (नायक)
१४) सन १९९९ मध्ये ज्योतीन गोयल दिग्दर्शीत या चित्रपटात संजय दत्त आणि जुही चावला होते.
१५) सन १९८३ मध्ये आलेल्या 'वो सात दिन' चित्रपटाचे दिग्दर्शक.
१६) गीत चल (चित्रपट)
१७) हमसे बढकर (चित्रपट)
१८) मै निकला गड्डी ले के... या गाण्याचा चित्रपट.
२०) सन १९९९ मध्ये इंद्रकुमार दिग्दर्शीत या चित्रपटात आमिर खान आणि मनिषा कोईराला होते.
२१) 'दाग दी फायर' चित्रपटाची नायीका.
२३) कहते है (चित्रपट)
२५) मुकुल (नायक)
२६) की आयेगी बारात (चित्रपट)
२७) कल आज (चित्रपट)
२८) 'नुरी' चित्रपटाचा नायक.
३२) जिंदगी प्यार का गीत है जिसे हर दिल को..... या गाण्याचा चित्रपट.
३३) प्यार कहा (चित्रपट)
३४) सन १९६४ मध्ये राम मुखर्जी दिग्दर्शीत या चित्रपटात दिलीप कुमार आणि वैजयंती माला होते.

### उभे संकेत

१) सन १९७० मध्ये आलेल्या 'सात पहरे' चित्रपटाची नायीका.
२) संजय दत्त, सलमान खान आणि करिश्मा कपूरचा चित्रपट.
३) बिवी (चित्रपट)
४) करिना कपूरचे नायक पिता
५) प्यार है (चित्रपट)
७) या पारिवारीक चित्रपटामध्ये सचिन, तनुजा आणि डॉ. श्रीराम लागू होते.
११) दिल है के (चित्रपट)
१३) बेवफा से (चित्रपट)
१४) सावन कुमार दिग्दर्शीत या चित्रपटात सलमान खान, चांदनी, पंकज धीर, कंचन, पुनीत इसार, डॅनी आणि प्राण होते.
१५) सन २००० मध्ये राज कंवर दिग्दर्शीत या चित्रपटात बॉबी देओल आणि रानी मुखर्जी होते.
१९) चोरी चुपके चुपके (चित्रपट)
२१) सन १९९७ मध्ये अफजल खान दिग्दर्शीत या चित्रपटात संजय दत्त आणि माधूरी दीक्षीत होते.
२२) अक्षय कुमार, सुनील शेट्टी, शिल्पा शेट्टी आणि महिमा चौधरीचा चित्रपट.
२३) आशा (नायीका)
२४) मेरी जान (चित्रपट)
२६) आमिर खान आणि पंकज कपूरचा चित्रपट.
२७) तेरी यही कहानी (चित्रपट)
२९) सुमन (नायक)
३०) सावन (चित्रपट)
३१) श्री (नायीका)



### मागील फिल्मी उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क | ल | हो | न | हो | | जा | न | शी | न | | | अ |
| भी | | | | गी | | | दी | | या | | | के |
| हां | मै | ने | भी | प्या | र | कि | या | | दि | ल | वा | ले |
| क | | हा | | र | | | के | त | न | | | ह |
| भी | | धू | | की | | रु | पा | | | क | स | म |
| ना | | पी | | जी | ना | | र | मे | श | | | अ |
| | दि | या | | त | | | | ज | | | | के |
| | ली | | | | जा | न | व | र | | मे | | ले |
| आ | प | ने | | खे | ल | | | सा | | हु | तू | तू |
| | कु | | शा | | | र | वी | ब | ह | ल | | म |
| हे | मा | मा | ली | नी | | ख | | | | कु | | |
| | र | | मा | | ज | वा | नी | | | मा | हि | र |
| | | भा | र | ती | | ला | | जी | ग | र | | वी |

# 'सिद्धार्थ वाणी'

उपप्रवर्तक श्री सिद्धार्थमुनीजी म.सा. तथा महासतीजी



डॉ. सौम्याश्रीजी आदि ठाणा ३ इनका चातुर्मास सावेडी स्थानक मे विराजमान है ।

**"भवभयहरण"**

भक्त आचार्य श्री मानतुंगदिव श्लोक (२८) ते श्लोक (३६) पर्यंत आठ महाप्रतिहार्य महिमाचे वर्णन करून परमेश्वराच्या दिव्य भव्य संवसाराचे विहंगावलोकन देत आहेत. समवसरणात देवाधिदेव महादेवाचे परम दिव्य महिमा एकत्रितपणे पाहून जणू कविश्री मंदिरातील कलश आणि ध्वज आपल्याला समर्पित आणि अनन्य चरणी अर्पण करत आहेत.

आसक्तीने रंगलेले, द्वेषाने दूषित आणि आसक्तीने फसलेले असताना वितराग प्रभूंचा महिमा सांगता येत नाही. जगात जो काही मानवी इतिहास घडला आहे तो धर्मशाही, राजेशाही किंवा लोकशाहीच्या स्थापनेवर आधारित आहे. मानव जातीची उत्क्रांती धर्मोपदेशकाच्या शिकवणीतून होते. प्रवचन जितके प्रभावी तत्त्वज्ञानावर आधारित असेल तितके प्रेमाचे साम्राज्य पसरते. प्रस्तुत श्लोकात वीतराग वाणीची परिणामकारकता दिव्यपणे दिसून आली आहे.

* **इत्थ** :- शब्द गंभीर अर्थपूर्ण भावना व्यक्त करतो. ही परंपरा भूतकाळापासून वर्तमानापर्यंत चालू आहे. आठ महाप्रतिहार्य चौतीस अतिशय आणि पस्तीस वाणी या गुणांनी विभूषित असलेल्या तीर्थंकर प्रभूंना तिन्ही लोकांत कोणीही हरवू शकत नाही. प्रभूच्या समावशरणात परमात्म्याचे दर्शन घेता येते. भगवंताचे वचन इतके प्रभावी आहे की ते तिन्ही लोकांतील अज्ञानाचा अंधार दूर करण्यास समर्थ आहे. ज्याप्रमाणे एक लहान दिवा विस्तीर्ण क्षेत्र प्रकाशित करतो, सर्वत्र प्रकाश पसरतो. त्याचप्रमाणे तीर्थंकरांचा प्रकाश तिन्ही लोकांच्या जीवांचे भावनिक जग प्रकाशित करण्यास सक्षम आहे. प्रस्तुत श्लोकात सूर्याच्या द्रव्यप्रकाशाबरोबर ज्ञानप्रकाशाची तुलना केली आहे. परंतु ज्योतिष मंडलचा तेज ते प्रभूच्या तेजाने तिरस्कृत होते. देवीधिदेवाच्या ज्ञानाच्या प्रकाशाची तुलना माणसाच्या ज्ञानाशी होऊ शकत नाही. देवाची शिकवण ऐकून इंद्र, देव आणि स्वर्गातील देवता देखील मंत्राचा जप करतात. ऐहिक सुख विसरून तासन्तास एकाग्रतेने देवाचे वचन ऐकतात. प्रवचन संपल्यावरही अनेक देवदेवता ध्यानस्त राहतात. ही परमेश्वराच्या उपदेश पद्धतीची अलौकिकता आणि पराकोटी आहे. समवसरण म्हणजे जिथे देव, मानव, स्त्रियांच हे तिन्ही पराक्रमी प्राणी समान मैत्रीने एकत्र बसतात, जो हास्य, मैत्री आणि करुणेचा पाया आहे. समवसरणात तीन गड असतात. (१) चांदीचा गड, सोन्याचा गड (२) सोन्याचा गड, रत्नाचा गड (३) रत्नाचा गड, मणिरत्नाचा गड आहे. समवसरणाला चार दरवाजे आहेत. प्रत्येक दरवाजाला प्रत्येकी (२०) वीस हजार पायऱ्या आहेत. गडाच्या मध्यवर्ती भागात अष्ट महाप्रातिहार्यत तीर्थंकर परमात्मा बसलेले आहे.

* **विभूति योग संपुट** :- तीर्थंकरत्वाची दैवी समृद्धी! समवसरणातील अद्भूत अष्टमहाप्रतिहार्याचे अलौकिक सौंदर्य, वाणीचे पस्तीस गुण आणि चौतीस श्रेष्ठत्व वीतराग सर्वज्ञता, केवळ सतत फिरणारे जग पाहणे आणि जाणणे शत्रू आणि मित्र यांच्याकडे समान दृष्टी असणे, जगाचा प्रकाश पसरवणे, प्रवचनाद्वारे शांती, सर्व जगाला शाश्वत आनंदाचा मार्ग दाखवणारे, सृष्टीचे सर्वात पवित्र आसन निरभिमानच्या सिंहासनावर बसलेले आहे. माझा आंतरिक आत्मा सर्वोत्तम दैवी शक्तिचा वाहक, चांगुलपणा आणि सौंदर्याच्या सुगंधाने भरला जावोय. माझा आत्मा तुझ्या चरणी शाश्वत आनंदात हरवून जावो. माझ्यासाठी तुम्हीच एकमेव आश्रय आहेत. अन्यथा शरणम् नास्ति त्वमेव शरणं मम । तस्मात् कारुण्य भावेन रक्षा रक्षा जिनेश्वर समवसरण समवसरण हे सर्व शुभस्मरणाचे पवित्र निवासस्थान आहे. सदैव समर्पित, सदैव देवाला भेटण्यासाठी समर्पित.

*** गाथा * (३७)**

**इत्थं यथा तव विभूतिरभूज्जिनेद्र ।**
**धर्मापदेशनविधौ ण तथा परस्य ।**
**यादृक-प्रभा दिनकृतः प्रहतांधकारा**
**तादृक कुतो ग्रहः गणस्य विकाशिनोऽपि ।।३७।।**

* अर्थ- *

समवसरण विभूती अहो वितराग देव । प्रवचन देताना तुमच्या दैवी उपस्थितीइतकी समृद्धी इतर देवांना नसते. कारण आकाशात चमकणारे तिर ग्रह नक्षत्र आणि ताऱ्यामध्ये अंधाराचा नाश करणारी इतकी शक्तिशाली चमक कशी असू शकते?

*** उत्तरध्यान सूत्र ***

उत्तराध्यान सूत्राच्या **बाराव्या** अध्ययनाचे नाव 'हरिकेश' या अध्ययनात साधना क्षेत्रातील भगवान महावीरांची क्रांतिकारी घोषणा आहे. धर्माचे गंगद्वार कोणत्याही जातीसाठी बंधकार नाही. ही साधना करणाऱ्या प्रत्येक व्यक्तिचे स्वागत करत आहे. जन्माने कोणीच महान होत नाही तर कृतीने महान होतो.

**तेराव्या अध्ययनात** :- दोन व्यक्तिची कथा आहे. जे पाच जन्मापर्यंत एकत्र राहिले व सहाव्या जन्मात विभक्त झाले. विभक्त होण्याचे कारण संभूत मुनिचे निदान - काम भोगची तीव्र आकांक्षा, चित्त मुनिने समजावून सुद्धा संभूत मुनिने निदानाचे प्रतिक्रमण केले नाही. ह्यात संयमचे वर्णन आहे.

आठवे अध्ययन, नववे अध्ययन, बारावे अध्ययन, तेरावे अध्ययन ह्या चार अध्ययनात चार वर्ण ऋषिचे आहे.

**- सौ. सविता चोरडिया**

# नगर शहरात पकडली ३ लाख ८४ हजारांची रोकड

## आचारसंहिता लागताच पोलिसांकडून कारवाई सुरु

नगर - विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यावर दुसऱ्याच दिवशी बुधवारी (दि.१६) सायंकाळी कोतवाली पोलिसांनी नगर शहरात एका व्यक्तीला मोठ्या रकमेसह ताब्यात घेतले आहे. अमरधाम परिसरात ही कारवाई करण्यात आली. दरम्यान, ही रोकड नेमकी कशाची आहे, याची ठोस माहिती न देऊ शकल्याने कोतवाली पोलिसांनी आचारसंहितेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार पुढील कारवाई सुरू केली आहे.

कोतवालीचे पोलिस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या सूचनेनुसार गुन्हे शोध पथकातील महिला स.पो.नि. योगिता कोकाटे, पो.हे.कॉ. औटी, पो.कॉ. तानाजी पवार, दीपक रोहकले, सुजय हिवाळे, सचिन लोळगे, संकेत धीवर, सुरज कदम, अनुप झाडबुके यांचे पथक विधानसभा निवडणूक आचारसंहितेच्या अंमलबजावणी कामी शहरात गस्त घालत असताना बुधवारी सायंकाळी अमरधाम परिसरात एका दुचाकी वर एक जण संशयित रित्या जाताना पथकाला दिसला.

पथकाने त्याला थांबवत नाव विचारले असता त्याने त्याचे नाव राहुल आदिनाथ शेरकर (वय ४४, रा. माळीवाडा, अहिल्यानगर) असे सांगितले. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे ३ लाख ८४ हजार ३०० रुपये रोकड आढळून आली. आचारसंहिता काळात ५० हजारांपेक्षा अधिक रक्कम बाळगण्यावर निर्बंध आहेत. सदर रक्कम कशाची आहे, कोठून आणली आहे, निवडणुकीशी याचा काही संबंध आहे का? या दृष्टीने पोलिसांनी त्याच्या कडे विचारपूस केली. मात्र संबंधित व्यक्तीला रकमेबाबत ठोस माहिती न देता आल्याने पोलिसांनी ही रक्कम ताब्यात घेतली आहे. आचारसंहितेच्या अनुषंगाने पुढील कारवाई केली जात असल्याचे पोलिस निरीक्षक प्रताप दराडे यांनी सांगितले.



छत्रपती चौथे शिवाजी महाराज विद्यार्थी सहाय्यता केंद्राचे उद्‌घाटन करताना आ. संग्राम जगताप. समवेत दीपलक्ष्मी म्हसे पाटील, यशवंत तोडमल, डॉ. सागर बोरुडे, राजेश कातोरे, चंद्रकांत गाडे, अभिजीत वाघ, ज्ञानदेव पांडूळे, संपूर्णा सावंत, अमोल गाडे, डॉ. अमित पवार, डॉ. दिपक दरंदले, आसिफ खान दूलेखान, प्रा.नंदा पांडूळे, मुन्ना चमडेवाले, धिरज कुमटकर, शुभम पांडुळे, विनित गाडे, केतन क्षिरसागर, संस्थेचे पदाधिकारी आदी.

# विद्यार्थी सहाय्यता केंद्र हा शेतकरी विद्यार्थी चळवळीचा ऐतिहासिक टप्पा

**आ. संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; छत्रपती चौथे शिवाजी महाराज विद्यार्थी सहाय्यता केंद्राचे उद्‌घाटन**

नगर - छत्रपती चौथे शिवाजी महाराजांच्या नावे शेतकरी विद्यार्थी सहायता केंद्र सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण पाठपुराव्यातून उभे केले व यासाठी मलाही योगदान देता आले याचा अभिमान आहे. दिल्ली दरवाजा ते पत्रकार चौक हा चौथे शिवाजी महाराजांच्या नावे असलेला रस्ता आम्ही दर्जात्मक करत आहोत. शेतकरी विद्यार्थी चळवळीसाठी हा ऐतिहासिक टप्पा असून आता शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी हक्काचे स्थान जिल्ह्याच्या ठिकाणी तयार होत आहे. महापुरुषांच्या स्मारकाचा भारतातील पहिला पायलट प्रोजेक्ट म्हणून या प्रकल्पाकडे पाहिले जाईल, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी छत्रपती शिवाजी महाराज विद्यार्थी सहाय्यता केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी केले.

जिल्हा मराठाच्या कोषाध्यक्ष दीपलक्ष्मी म्हसे यांनी प्रस्तावित कामाबद्दल समाधान व्यक्त करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रस्तावनेत स्मायलिंग अस्मिताचे कार्याध्यक्ष यशवंत तोडमल म्हणाले की, आमच्या संघटनेची वाटचाल बुद्धिमत्ता व नीतिमत्ता या सूत्रावर चालते. शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी हा ऐतिहासिक क्षण असून चांगले सहकारी व कामात सातत्य होतेच; परंतु लोक प्रतिनिधींच्या इच्छा शक्तीमुळे आम्ही हा टप्पा गाठू शकलो. कवडीचेही योगदान नसताना अनेकांचा इतिहास शाळा महाविद्यालयांमध्ये शिकवला जातो परंतु स्वातंत्र्यासाठी स्वतः चे राज्य व प्राणाचे बलिदान देणाऱ्या छत्रपतींचा झाकलेला इतिहास आता पुढे येईल हे खूप क्रांतिकारक आहे.

कार्यक्रमा दरम्यान पाऊस आला तरीही भाषणे झाली व एकही इतिहास प्रेमी जागचा हलला नाही ही विशेष बाब कार्यक्रमात घडली. प्रस्तावित कामाचा शुभारंभ स्मारक परिसरात नव्याने लावलेल्या झाडाला पाणी घालून आणि उपस्थित महिलांच्या हस्ते नारळ फोडून झाला. कार्यक्रमासाठी माजी नगरसेवक डॉ. सागर बोरूडे, राजेश कातोरे, जिल्हा मराठा विद्या प्रसारकच्या कोशाध्यक्ष दिपलक्ष्मी म्हसे, सकल मराठाचे चंद्रकांत गाडे, मराठा सेवा संघाचे अभिजीत वाघ, रयत शिक्षणचे ज्ञानदेव पांडूळे, जिजाऊ ब्रिगेडच्या संपूर्णा सावंत, अमोल गाडे, सुरभी हॉस्पिटलचे डॉ. अमित पवार, डॉ. दिपक दरंदले, आसिफ खान दूलेखान, राजमुद्रा अॅकॅडमीच्या प्रा.नंदा पांडूळे, मुन्ना चमडेवाले यांसह जिल्ह्यातील इतिहास प्रेमी व शेतकरी कुटुंबातील विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धिरज कुमटकर यांनी केले तर आभार प्रदर्शन शुभम पांडुळे यांनी केले.

# राज्याच्या कृषी परिषदेच्या संचालकपदी गणेश शिंदे

**अहिल्यानगरकरांचा सन्मान; शेतकऱ्यांच्या घामाला व कष्टाला प्रतिष्ठा देण्यासाठी गुंजतेय शिंदे वाणी**



नगर - युवा व्याख्याते, स्वास्थ्य व समाजप्रबोधनकार म्हणून महाराष्ट्रभर नावाजलेले आणि संत ज्ञानेश्वरांच्या चरित्रावरील मोगरा फुलला या संगीतमय कार्यक्रमाचे सादरकर्ते गणेश शिंदे यांची राज्य कृषि परिषदेच्या संचालकपदी निवड करण्यात आली. महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी मंगळवारी (दि.१५) शिंदे यांच्या नियुक्तीचा आदेश काढला.

गणेश शिंदे हे नगर तालुक्यातील पारगाव भातोडी येथील रहिवासी आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली पारगाव भातोडी आदर्श गावाकडे वाटचाल करत आहे. पारगाव भातोडी या छोट्याशा गावात सर्वसामान्य कुटूंबात शिंदे यांचा जन्म झाला. वक्तृत्व स्पर्धेतून पुढे आलेल्या शिंदे यांनी व्याख्यानांच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचा वसा उचलला. अनोख्या पद्धतीने विनोदी शैलीत समाज प्रबोधन करीत त्यांनी नावलौकिक कमावला आहे. शासनाच्या विविध उपक्रमांतही सहभागी होऊन त्यांनी आपल्या ज्ञानाचा व वक्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. त्यांच्या कर्तृत्वाला शासनाने ही नेहमी संधी देत त्यांचा सन्मान ठेवला आहे.

महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेचे सदस्य म्हणून कार्य करत असताना त्यांनी विद्यापीठाचे तंत्रज्ञान, नवीन पणन प्रणाली शेतकऱ्यांपर्यंत पोहोचाव्यात यासाठी आपल्या व्याख्यानांतून व इतर उपक्रमांतून मोठे प्रयत्न केले आहेत. तसेच शेतकऱ्यांचे मनोबल उंचवावे, त्यांच्या घामाला व कष्टाला प्रतिष्ठा मिळावी, यासाठी गणेश शिंदे यांनी आजवर अनेक व्याख्याने दिली आहेत. आपल्या रसाळ व मधाळ वाणीतून त्यांनी अनेक शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविले आहे. आता राज्याच्या कृषी परिषदेवर संचालक म्हणून कार्य करण्याची संधी त्यांना मिळाली आहे. ही अहिल्यानगर जिल्ह्यासाठी भूषणावह गोष्ट आहे.

भारत हा कृषिप्रधान देश असून येणाऱ्या काळात तो कृषी समृद्ध व्हावा यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज आहे. या प्रक्रियेमध्ये शासनासोबतच संशोधनाच्या दृष्टीने विद्यापीठांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. शासन व विद्यापीठ यांमधील दुवा म्हणून कार्य करण्याची संधी या निमित्ताने प्राप्त झाली. या संधीचे निश्चितच सोने करेल, असा विश्वास गणेश शिंदे यांनी निवडीनंतर व्यक्त केला.

### वक्तृत्व स्पर्धा ते संचालकपदापर्यंत प्रवास

पारगाव भातोडी येथे सर्वसामान्य कुटूंबात जन्मलेल्या गणेश शिंदे यांना शालेय जीवनातच वक्तृत्वाचा छंद जडला. त्यांनी शालेय, महाविद्यालयीन स्तरावर राज्यभरातील जवळपास सर्वच स्पर्धा गाजविल्या. विद्यापिठांच्या स्पर्धांमध्ये गणेश शिंदे यांच्या वक्तृत्वाला तोड नव्हती. त्यामुळे त्यांना वेगवेगळ्या कार्यक्रमांमध्ये समाज प्रबोधनासाठी निमंत्रणे येऊ लागली. पुढे शासकीय अधिकाऱ्यांना वेगवेगळ्या पातळीवर प्रशिक्षित करणाऱ्या यशदा या शासकीय संस्थेत ते प्रशिक्षक म्हणून रुजू झाले. त्यानंतर शासनाच्या विविध उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग व योगदान राहिले आहे. आता त्यांची राज्याच्या कृषि संचालकपदी निवड झाली आहे.

# महाराष्ट्र राज्य ज्युनियर आंतरजिल्हा फुटबॉल चॅम्पियनशिपसाठी २१ ऑक्टोबरपासून भुईकोट किल्ला मैदान येथे जिल्हा निवड चाचणी

**सीआरएस नोंदणी करुन निवड चाचणीत सहभागी होण्याचे आवाहन**



नगर - महाराष्ट्र राज्य ज्युनियर आंतरजिल्हा फुटबॉल चॅम्पियनशिप (१५ वर्षा खालील) फुटबॉल स्पर्धेसाठी अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनच्या वतीने जिल्हा निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. भुईकोट किल्ला मैदान येथे २१ ऑक्टोबर पासून निवड चाचणीला प्रारंभ होणार आहे. या निवड चाचणीद्वारे जिल्ह्याचा संघ निवडला जाणार आहे. या निवड चाचणीत सहभागी होण्यासाठी फुटबॉल संघ व खेळाडूंना सीआरएस नोंदणी करुन सहभागी होण्याचे आवाहन असोसिएशनच्या वतीने करण्यात आले आहे.

असोसिएशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया व वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड चाचणी होणार आहे. सचिव रौनप फर्नांडिस यांच्या उपस्थितीमध्ये १८ खेळाडूंची संघात निवड होणार आहे. निवड झालेल्या खेळाडूंसाठी प्रशिक्षण शिबिरचे आयोजन करण्यात येणार असून, यामध्ये तज्ञ फुटबॉल प्रशिक्षक खेळाडूंना मार्गदर्शन करणार आहेत. निवड झालेला जिल्ह्याचा संघ शिरपूर (धुळे) येथे ५ ते १० नोव्हेंबर दरम्यान होणाऱ्या महाराष्ट्र राज्य ज्युनियर आंतरजिल्हा फुटबॉल चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी रवाना होणार आहे.

यामध्ये १ जानेवारी २०१० नंतर किंवा ३१ डिसेंबर २०११ च्या पूर्वी जन्मलेल्या खेळाडूंना सहभागी होता येणार आहे. निवड चाचणीत सहभागी होण्यासाठी नोंदणी करणे आवश्यक असून, सीआरएस नोंदणी न केलेल्या खेळाडूंना निवड चाचणीत खेळता येणार नाही. खेळाडूंना त्यांचा मूळ जन्म प्रमाणपत्र आणि सोबत आधारकार्ड, पासपोर्ट आणणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून जेव्हिअर स्वामी, तर सहाय्यक प्रशिक्षक वैभव मनोदिया राहणार आहे. निवड चाचणी यशस्वी करण्यासाठी राजू पाटोळे, प्रदीप जाधव, व्हिक्टर जोसेफ प्रयत्नशील आहेत.

# सराईत गुन्हेगाराला एमपीडीए कायद्यान्वये केले स्थानबद्ध

## जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानंतर नगर तालुका पोलिसांची कारवाई

नगर - नगर तालुक्यातील अरणगाव येथील एका सराईत गुन्हेगारावर झोपडपट्टी दादा प्रतिबंधक कायद्यान्वये (एमपीडीए) स्थानबद्धतेच्या प्रस्तावाला जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी मंजुरी दिली असून हा प्रस्ताव मंजूर होताच नगर तालुका पोलिसांनी त्यास ताब्यात घेत नाशिकच्या कारागृहात स्थानबद्ध केले आहे.

कृष्णा बाबासाहेब गुंड (वय २७, रा. अरणगाव, ता.नगर) असे या गुन्हेगाराचे नाव असून त्याच्यावर खुनी हल्ल्यासह गंभीर स्वरूपाचे ६ ते ७ गुन्हे दाखल आहेत. त्याच्या गुन्हेगारी कृत्यांना आळा घालण्यासाठी नगर तालुका पोलिस ठाण्याचे स.पो.नि. प्रल्हाद गिते यांनी २ महिन्यांपूर्वी त्याच्यावर एमपीडीए कायद्यान्वये कारवाई साठीचा प्रस्ताव नगर ग्रामीणचे पोलिस उपअधीक्षक संपत भोसले यांच्या मार्फत जिल्हा पोलिस अधिक्षक राकेश ओला यांच्या कडे पाठवला होता. पोलिस अधिक्षक ओला यांनी तो तपासून शिफारशीसह जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविला होता. जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी या प्रस्तावास बुधवारी (दि.१६) मंजुरी दिली. सदर प्रस्ताव मंजूर होताच नगर तालुका पोलिसांनी कृष्णा गुंड याला ताब्यात घेत त्याची रवानगी नाशिकच्या कारागृहात केली आहे.

स.पो.नि. प्रल्हाद गिते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक जयेश गांगुर्डे, पोलिस अंमलदार संभाजी बोराडे, विक्रांत भालसिंग, विशाल टकले, सुभाष थोरात, राजू खेडकर, महिला पो.कॉ. रुपाली शेलार यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# चेक अनादर प्रकरणी आरोपीस दंड व शिक्षा

नगर - दिल्लीगेट येथील श्री लक्ष्मी महिला पतसंस्थेकडून घेतलेल्या कर्जापोटी दिलेला चेक न वटल्याप्रकरणी कर्जदार ताडला विजया देवानंद (रा. दातरंगे मळा, अहिल्यानगर) यांना न्यायालयाने ३९ हजार रुपये दंड व ३ महिने शिक्षा सुनावली आहे.

या केसमध्ये कर्जदार ताडला विजया देवानंद यांनी ४/१०/२०१९ रोजी ४५ हजार रुपये कर्ज घरगुती कारणासाठी घेतले. त्यांनी दरमहा नियमित कर्ज हप्ते भरले नाही. शेवटी थकीत कर्जापोटी नगर येथील बारामती बँकेचा चेक ३९ हजार रुपये १२ नोव्हेंबर २०२१ मध्ये दिला. मात्र बँकेत पुरेशी रक्कम नसल्यामुळे सदर चेक परत आला.

त्याबाबत संस्थेने न्यायालयात ताडला विजया देवानंद यांच्या विरुध्द निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट कलम १३८ अन्वये दाखल केलेल्या केसेसची सुनावणी होऊन आरोपी ताडला विजया यांना ३ महिने सक्षम कारावास आणि ३९००० हजार रुपये दंडाची रक्कम दोन महिन्यात भरावी अन्यथा आणखी ३ महिने सजेची शिक्षा सुनावली आहे. पतसंस्थेच्या वतीने अॅड. गाली राजू यांनी काम पाहिले.

# मोबाईलवर ऑनलाईन गेममध्ये पैसे गमावल्याने सुरु केल्या वाहन चोऱ्या

## नगरच्या टोळीला पुणे पोलिसांनी पकडले, चोरलेल्या १८ दुचाकी केल्या हस्तगत



पुणे - मोबाईलवर अॅवेटर हा ऑनलाईन गेम खेळण्याचा नाद लागलेल्या तरुणाने गेममध्ये लावलेले पैसे गमावले. त्यामुळे पैसे मिळवण्यासाठी त्याने युट्युब पाहून वाहनचोरी करण्याचे तंत्र आत्मसात करत, वाहनचोरी करुन ती वाहने कमी किंमतीत विक्री करुन त्यातून मिळालेल्या पैशातून पुन्हा ऑनलाइन गेमच्या आहारी जाऊन पैसे गमावल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. दरम्यान, वाहनचोरी करुन त्याची विक्री करणाऱ्या टोळीस पिंपरी चिंचवड पोलिसांनी जेरबंद केले आहे. त्यांच्या ताब्यातून २६ लाख रुपयांच्या १८ दुचाकी हस्तगत करण्यात आल्या आहे.

अभय सुरेश खर्डे (वय-२३, रा. झोळे, ता.संगमनेर, सध्या रा. गुंजाळवाडी रोड, संगमनेर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्यास चोरीच्या गाडया विक्री करण्यासाठी मदत केल्याने शुभम बाळासाहेब काळे (वय २४, रा.कोपरगाव), रविंद्र निवृत्ती गव्हाणे (वय २३, रा.आंजनापूर, ता.कोपरगाव), यश नंदकिशोर थुट्टे (वय २२, रा.चिखली, बुलढाणा, सध्या रा.अशोकनगर, नाशिक), प्रेम भाईदास देवरे (वय २०, रा.नाशिक) या आरोपींना अटक करण्यात आली आहे, अशी माहिती पोलिस उपायुक्त डॉ. शिवाजी पवार यांनी दिली.

पुणे-नाशिक रस्त्यावर चाकण पोलीस ठाण्याचे हद्दीत बुलेट गाडया चोरीचे प्रमाण मागील काही दिवसांपासून वाढले होते. याबाबत दाखल झालेल्या एका गुन्हयाचा तपास पोलीस करत असताना त्यांनी चोरटयांचा माग काढण्यासाठी सुमारे १५० सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करत ते संगमनेर पर्यंत पोहचले. त्यावेळी संशयीत आरोपी अभय खर्डे यास पोलिसांकडून ताब्यात घेण्यात आले.

त्याच्याकडे सखोल चौकशी केली असता त्याने चाकण भागातून वाहन चोरी केल्याची कबुली दिली. साथीदारांचे मदतीने वाहने विक्री केल्याचे त्याने सांगितल्यावर पोलिसांनी २६ लाखांची १८ वाहने जप्त केली. यात ११ बुलेट, सहा सप्लेंडर व एक यामाहा दुचाकीचा समावेश आहे. चाकणचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रमोद वाघ, नाथा घार्गे, सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रसन्न जराड, गणपत धायगुडे यांच्या पथकाने केली आहे.

# जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली मिळकत ७ / १२ दप्तरी कायदेशिर नावे असलेल्या विद्यमान मालक यांच्या मालकी हक्काची व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीची आहे. नमूद मिळकतीच्या विद्यमान मालक यांच्या हिश्यातील संपूर्ण क्षेत्राची विक्री करण्याची यथायोग्य बोलणी विद्यमान मालकांसह त्यांचे कुटुंबिय व कायदेशीर वालीवारस आणि आमच्या अशिलांमध्ये झालेली असून नमूद मिळकत कायमखुष, कायमस्वरुपी खरेदीकामी आमच्या अशिलास प्रस्ताव दिलेला आहे. याव्दारे विद्यमान मालक यांच्या मालकीहक्काच्या खालील परिशिष्ठात नमुद मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार राहु नये म्हणून प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करुन कळविण्यांत येते की, खालील परिशिष्ठातील विद्यमान मालक यांच्या मालकीहक्काच्या मिळकतीबाबत कोणाही त्रयस्थ इसम व्यक्ती, संस्था, खासगी फर्म यांच्या समवेत विद्यमान मालक यांनी साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षिसपत्र अगर कोणत्याही स्वरुपाचे कायदेशिर हस्तांतरणाचे कोणत्याही स्वरुपाचे दस्त नोंदणीकृत अगर निष्पादीत केले असल्यास आणि नमूद मिळकतीबाबत कोणत्याही न्यायाधिकरणाने आदेशान्वीत करुन मिळकत कोणत्याही स्वरुपाने मिळकत हस्तांतर करणेकामी तुर्तातुर्त अथवा निरंतर मनाईहुकुम दिला असल्यास अथवा खालील परिशिष्ठात नमुद विद्यमान मालक यांच्या मालकीहक्काच्या मिळकतीबाबत कोणत्याही न्यायाधिकरणासमोर आणि न्यायालयात दावा, वाद, हरकत, तक्रार प्रलंबित असल्यास किंवा कधीही कोणत्याही न्यायालयाने मिळकतीबाबत कोणत्याही स्वरुपाचे आदेश, जप्ती, कोर्ट कारवाई केली असल्यास त्याचप्रमाणे नमुद मिळकतीवर कोणत्याही बँक, वित्तीय संस्था, पतसंस्था, खासगी सावकार यांचे कर्जबोजे, सोसायटी राईटस अन्न वस्त्र लिज अथवा अगर कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास, कोणत्याही प्रशासनाने, शासकीय कार्यालयाने, प्रशासनाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही कार्यालयाकरवी कधीही कोणत्याही स्वरुपाचे हक्क प्रस्थापित करुन मिळकत आरक्षित अगर अधिग्रहीत केली असल्यास त्याव्दारे विद्यमान मालक यांचे मालकीहक्क संपुष्टात येत असल्यास संबंधीत व्यक्ती, संस्था, त्रयस्थ इसम व्यक्ती, शासकीय निमशासकीय आणि शासन प्राधिकृत कार्यालय यांची विद्यमान मालक यांच्या खालील परिशिष्ठात नमुद मिळकतीच्या आमचे आशिल यांच्या समवेत ठरलेल्या व्यवहाराबाबत आणि त्यायोगे हस्तांतरणाबाबत कोणत्याही स्वरुपाची हरकत, तक्रार, बाधा असल्यास त्या सर्व संबंधितांनी सदर नोटीस प्रसिध्द झाले पासुन **१५ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर **संपुर्ण प्रशासकीय आणि नोंदणीकृत कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे,** जर मुदतीत कोणाचेही कोणतेही कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल ७/१२ दप्तरी अस्तित्वात असलेल्या विद्यमान मालकांना ठरलेला यथायोग्य मोबदला अदा करुन हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील तद्नंतर कोणाचेही कोणत्याही प्रकारे तक्रार अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल. प्रस्तुत जाहीर नोटीसीस केवळ वर्तमानपत्रातुन घेतलेल्या कोणत्याही स्वरुपाच्या हरकती ग्राह्य धरता येणार नाही याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**१) मिळकतीचे वर्णन:–**

डि.।। अहमदनगर सब. डि. ।। ता. नगर पैकी अहमदनगर जिल्हा परिषद हद्दीतील मौजे **दरेवाडी** येथील मे. दुय्यम निबंधक साहेब, अहमदनगर यांचे कार्यक्षेत्रातील शेतजमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:–

| गट नं. | क्षेत्रफळ हे. आर. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ४६ / २अ | ०१–८४.५०<br>पो.ख. ०० – ३६<br>०२–२०.५०<br>(संगणकीय ७ / १२ प्रमाणे २.२०.५०) | २–७३ |

यापैकी ७/१२ दप्तरी असलेल्या खालीलप्रमाणे नमुद सर्व विद्यमान मालक यांच्या वडिलोपार्जित मालकी हक्काच्या, वागणुकीच्या व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीच्या संपुर्ण शेतजमिन मिळकतीबाबत.

–:यांसी चतु:सिमा:–

महसुल प्रशासकीय रेकॉर्डप्रमाणे व कायदेशिर मोजणीअंती आलेल्या प्रत्यक्ष वागणुकीच्या व वहीवाटीच्या परिस्थितीप्रमाणे

येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक काही एक राखुन न ठेविता.

स्वतंत्र खाते क्र. १०० अन्वये असलेले मिळकतीचे विद्यमान मालक–

**कमल पांडुरंग भिंगारदिवे (मयत) – यांचे कायदेशिर वालीवारस–** अ) दिनकर भास्कर घाटविसावे, ब) प्रभाकर भास्कर घाटविसावे, क) संजय भास्कर घाटविसावे, ड) मधुकर भास्कर घाटविसावे, इ) दिवाकर भास्कर घाटविसावे, ई) छाया सुरेश कांबळे, उ) माया राजु शिंदे.

सामाईक खाते क्र. ५५९ अन्वये असलेले मिळकतीचे विद्यमान मालक–

१. दिनकर भास्कर घाटविसावे, २. प्रभाकर भास्कर घाटविसावे, ३. संजय भास्कर घाटविसावे, ४. मधुकर भास्कर घाटविसावे, ५. दिवाकर भास्कर घाटविसावे, ६. छाया सुरेश कांबळे, ७. माया राजु शिंदे, **८. गया रावसाहेब साळवे (मयत) यांचे कायदेशिर वालीवारस–** ८अ) दिनकर भास्कर घाटविसावे, ८ब) प्रभाकर भास्कर घाटविसावे, ८क) संजय भास्कर घाटविसावे, ८ड) मधुकर भास्कर घाटविसावे, ८इ) दिवाकर भास्कर घाटविसावे, ८ई) छाया सुरेश कांबळे, ८उ) माया राजु शिंदे.

स्वतंत्र खाते क्र. ६९० अन्वये असलेले मिळकतीचे विद्यमान मालक – **यमुनाबाई धर्माजी उबाळे (मयत) यांचे कायदेशिर वालीवारस** – १. जनाबाई सुंदर उबाळे, २. कुमुद सुंदर उबाळे, ३. विशाल सुंदर उबाळे, ४. संगिता सुंदर उबाळे, ५. वनिता सुंदर उबाळे, ६. सरिता सुंदर उबाळे, ७. आकाश सुंदर उबाळे, ८. उषाबाई तुळशिराम उबाळे, ९. किशोर तुळशिराम उबाळे, १०. अतिष तुळशिराम उबाळे, ११. स्वप्ना तुळशिराम उबाळे, १२. मनोहर धर्माजी उबाळे, १३. सनी अर्जुन उबाळे, १४. ऋषीकेश अर्जुन उबाळे, १५. अक्षय अर्जुन उबाळे, १६. व्दारका पंडित उबाळे, १७. निलेश पंडित उबाळे, १८. निलम पंडित उबाळे, १९. प्रियंका पंडित उबाळे, २०. सुमोद धर्माजी उबाळे, २१. सिध्दार्थ धर्माजी उबाळे.

सामाईक खाते क्र. ८८४ अन्वये असलेले मिळकतीचे विद्यमान मालक –

१. सुभाष विठ्ठल भिंगारदिवे, २. प्रदिप विठ्ठल भिंगारदिवे, ३. सिता विठ्ठल भिंगारदिवे, ४. पार्वती विठ्ठल भिंगारदिवे, ५. विमल शंकर तांबे, ६. निर्मला उत्तम शिंदे, ७. जगन्नाथ सखाराम भिंगारदिवे.

सामाईक खाते क्र. १०९५ अन्वये असलेले मिळकतीचे विद्यमान मालक –

१. रमेश धोंडीराम भिंगारदिवे, २. संगिता बबन धिवर, ३. अनिता एकनाथ भिंगारदिवे, ४. सरिता सुंदर उबाळे, ५. दोपदाबाई धोंडीराम भिंगारदिवे, ६. विशाल सुंदर उबाळे, **७. सुनिल धोंडीराम भिंगारदिवे (मयत) यांचे कायदेशिर वालीवारस–** ७अ) सिमा सुनिल भिंगारदिवे, ७ब) सम्राट सुनिल भिंगारदिवे, ७क) आदिती दिनेश शिंदे, ७ड) दिक्षा सुनिल भिंगारदिवे, ८. सकुबाई झुंबर गायकवाड, **९. लताबाई बबन पाटोळे (मयत) यांचे कायदेशिर वालीवारस** – ९अ ) जयश्री राजेश यादव, ९ब) कल्पना बाबासाहेब मगर, १०. मंजुळाबाई दिलीप बोरसे, ११. अलका अरुण शिंदे, १२. कुमुद सुंदर उबाळे.

सामाईक खाते क्र. ८२७९० अन्वये असलेले मिळकतीचे विद्यमान मालक –

१. शीला अशोक भिंगारदिवे, २. पवन अशोक भिंगारदिवे, ३ . शितल अशोक भिंगारदिवे.

सामाईक खाते क्र. १२१७१६ अन्वये असलेले मिळकतीचे विद्यमान मालक –

१.मार्या संजय कदम, २. अर्चना संजय रोकडे, ३. विपुल विशाल भिंगारदिवे, ४. किरण विशाल भिंगारदिवे क्र. ३ व ४ करिता अपाक आई मारीया उर्फ मार्या विशाल भिंगारदिवे ५. मारीया उर्फ मार्या विशाल भिंगारदिवे, ६. अरुण एकनाथ भिंगारदिवे, ७. मोनिका प्रभाकर पाटोळे ८. सीमा अशोक बागुल ९. बेबीनंदा गिरीष कन्हेपेल्ली/कड्डेपल्ली.

सामाईक खाते क्र. १२१७१७ अन्वये असलेले मिळकतीचे विद्यमान मालक –

१. राजीव अभिमन्यु भिंगारदिवे, २. रुपल अभिमन्यु भिंगारदिवे, ३. भारत अभिमन्यु भिंगारदिवे, ४. शुभांगी प्रदीप जावळे.

सामाईक खाते क्र. १२२२६० अन्वये असलेले मिळकतीचे विद्यमान मालक –

१. सुनिता सुरेश भिंगारदिवे, २. धनंजय सुरेश भिंगारदिवे करीता अपाक आई सुनिता सुरेश भिंगारदिवे

**ॲड. संदिप दादासाहेब पाखरे**
६२७०, लॉयर्स ऑफिस, लक्ष्मीदिप निवास,
बालिकाश्रम जवळ, अहमदनगर.
मो.नं. ९८५०१८१७१७ / ९८५९१८१७१७

दि. १७/१०/२०२४
अहमदनगर

टि.व्हि. सेंटर चौकात, सावेडी येथे रोडटच २०० स्क्वे.फु. गाळा भाड्याने देणे
7057953250

रो हाऊस विकणे आहे
प्लॉट ६३० स्क्वे.फूट
बांधकाम १००० स्क्वे.फूट
खाली 1 BHK वरती 1 BHK
गणेश देशपांडे
वरद कॉलनी, भुतकरवाडी , सावेडी रोड, अहिल्यानगर.
9930317336

विकणे/भाड्याने देणे
* चितळेरोड जवळ दोन नविन २ बीएचके तसेच नविन फ्लॅट, लिफ्ट व चारचाकी पार्किंगसह तिसऱ्या मजल्यावरील फ्लॅट विकणे आहे
* सातभाई गल्ली येथील बेसमेंट मधील ७०० स्के. फुट हॉल क्लासेस, ऑफिसेस, गोडाऊनसाठी भाड्याने देणे आहे
9890838389

महाराष्ट्र स्क्रॅप
एमआयडीसी
आमच्याकडे सर्व कंपनीचे जुने, डॅमेज, खराब ए.सी, फ्रीज योग्य किंमतीत विकत घेतो.
9561424225

दर्जेदार व माफक दरात
फ्लेक्स प्रिंटींग
9403232323

नामांकित ऑफीसमध्ये कामाची सुवर्णसंधी...
पात्रता : किमान १२ वी पास
(पगार ८ ते १२ हजार)
9689951111
9623241111

पाहिजेत
क्लिनीकमध्ये कामासाठी मुलगा/मुलगी पाहीजे
१२ वी पास किंवा नापास
सकाळी – ११.३० ते ५.३०
रात्री– ८ ते १२
9226936000

पाहिजेत
अहमदनगर व पुणे जिल्ह्यामध्ये कामासाठी भरपूर संख्येने सिक्युरिटी गार्ड+मामा+मावशी+ सुपरवायझर, लेडी ऑफिस असिस्टंट पाहिजेत
मिश्रा सिक्युरिटी ॲण्ड फायर सर्व्हिस
सदगुरु क्लासिक अपार्टमेंट, पवननगर,भिस्तबाग, नवीन तलाठी कार्यालयाशेजारी, सावेडी, अ.नगर
9422222241, 8888886073
8888889041

पाहिजेत
प्रेरणा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित
कार्यालय नं.१, पहिला मजला, मार्केटयार्ड, भाजीमार्केट प्रवेशद्वाराजवळ,अहमदनगर–४१४००१
मो : 9922651515, 9850823154
* क्लार्क कम कॅशिअर : १ जागा (लेडीज/जेन्टस)
* कुठल्याही शाखेचा पदवीधर * संगणकाचे ज्ञान आवश्यक
* अनुभवी व्यक्तीस प्राधान्य
* शिपाई : १ जागा (१० वी पास, लेडीज/जेन्टस)
सदर व्यक्तीने सर्व कागदपत्रे घेऊन संस्थेमध्ये दि.२३/१०/२०२४
व्यवस्थापक
प्रेरणा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित अहमदनगर
चेअरमन
प्रेरणा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित अहमदनगर

VAISHNAVI TILES & TRADING CO.
• सर्व प्रकारच्या टाइल्स • ग्रॅनाइट • सॅनिटरी वेअर
• पीव्हीसी पाईप्स आणि फिटिंग • C.P. फिटिंग्ज
9590151515 | 9262515151
प्लॉट नं.5, हुंडेकरी शोरूमच्या मागे, सावेडी, अहमदनगर
VARMORA TILES • BATHWARE
KERAKOLL The GreenBuilding Company
CARYSIL German Engineered
colortile
RAK
NIRALI
TIMEX
ICON

फ्लॅट विकणे आहे
शहराच्या मध्यवस्तीत कोर्ट परिसरात 1 BHK फ्लॅट सर्व सोयींनी युक्त योग्य किंमत आल्यास त्वरित विकणे आहे.
9881931430

धनश्री उद्योग
सरकारमान्य संस्था
घरातून काम करा व रोज कमवा
500 ते 1000 रु.
बाराही महीने विविध पॅकिंगचे व्यवसाय करा..
माल फ्री घरपोहोच
अंबर प्लाझा बेसमेंट, नमो मेडिकलच्या खाली, माळीवाडा एस.टी. स्टॅण्ड समोर, अ.नगर.
7066575497

टिप : मुव्ही–शो च्या वेळा बदलु शकतात
दिनांक : 17 ते 24 ऑक्टोबर 2024
SINGHAM 11:30 AM
PHULLWANT 04:45 PM
LIKE ANI SUBSCRIBE 02:15 PM
JIGRA 09:00 AM I 02:00 PM 07:00 PM
VETTAIYAN 08:30 AM I 10:30 PM
BINNY & FAMILY 07:30 PM
THE WILD ROBOT-3D 12:00 PM I 05:00 PM
DEVARA PART-1 07:15 PM
RAJA RANI 11:15 AM
VICKY VIDYA KA WOH WALA VIDEO 08:30 AM I 01:45 PM I 10:30 PM
PAANI 04:55 PM
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
AVAILABLE ON bookmyshow
CONNPLEX SMART THEATRE
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001

Career Ki Shuruwat DISHA ke saath
An ISO 9001:2015 Certified
DISHA COMPUTER INSTITUTE
Accounting & Taxation
च्या क्षेत्रात विद्यार्थ्यांची उत्तरोत्तर प्रगती हेच आमचे ध्येय
CERTIFICATE COURSE IN ADVANCE ACCOUNTING
COMPUTER APPLICATION
ADVANCE ACCOUNTING
TAXATION, BANKING
AUDITING
Duration : 6 Months
100% JOB ASSISTANCE
Experienced Faculties | 1 Lac + Students Trained | Job Assistance
Delhi Gate Branch
1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate, Ahmednagar-414001
9371051769
Old ST stand Branch
1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road, A.nagar
9371151769
Pipeline Branch
Office No. 202, Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road, Ahmednagar, 414003
7447761769

CHANGE IN NAME
MY OLD NAME WAS
RIYA KETAN VIJJAN
MY NEW NAME IS
SHITAL KETANKUMAR VIJAN
IT WILL BE USED FOR ALL FUTURE PUPROSES.
AADHAR CARD NO.
846177696194

आता वजन कमी करणे किंवा वाढवणे झाले सोपे
तुमच्या घरातून दररोज व्यायाम करा.
यासाठी मोफत मार्गदर्शन.
अंबादास इंगळे
Ex Army Fitness Expert
मो. 8888352220
8888362220

COMMING SOON
The Club Resort
* Lawns * Ac banquet * luxuries Room
* unique restorant * and many more ...
Address : Behind D.Mart, Hotel Nagri village, Ahilyanagar
9270570699

शाळेमध्ये CCTV लावणे मजबुरी नाही तर गरज आहे
ISO 9001 : 2015 Certified
Mandar Mulay
98222 94622
94220 87757
Swami Vivekanand Chowk, Gujar Galli, Ahmednagar

डॉ.अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन
* चेहऱ्यावरील स्नायू फडकणे यासाठी बोटॉक्स इंजेक्शनची सुविधा
* पाठदुखी/मज्जा रज्जूवरील आजारे
* डोळ्यांच्या नसांवरील सूज/ऑप्टीक न्यरैटिस
यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.
* सर्व आजारांसाठी ॲडमिट सुविधा उपलब्ध.
* सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे
एशियन नोबल हॉस्पिटल प्रेमदान चौक, अ.नगर रोज दुपारी १ ते ५ या वेळेत

देडगांवकर टुर्स आयोजित यात्रा
सहल २४/१/२०२५ (८ दिवस)
शिमला–कुलू–मनाली सहल
(कुर्फी मॉल रोड, अटल टनेल, सोलंग व्हॅली, हंडिबा मंदिर व इतर)
सहल ९/२/२०२५ (८ दिवस)
गंगासागर, कलकत्ता, जगन्नाथपुरी, कोणार्क सुर्यमंदीर
(राहण्याची व्यवस्था, जेवण, रेल्वे प्रवास व बस प्रवास)
* गौरव दिलीप देडगांवकर *
9422452756/9529202258

२३ वे पुण्यस्मरण
स्व.सौ.कुसुमबाई शिवशंकर राठोड
स्व.अश्विन नव्यात्र पौर्णिमा २००१
आदर्श सेवादायी जीवन.. आभाळासम विशाल मन...
कर्तुत्व आपले देई स्फुरण.. स्मृतीस आपल्या शतदा वंदन...!
सुसंस्काराची शिकवण देणाऱ्या आपल्या प्रेमळ स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली
* दु:खांकित *
संजय राठोड व राठोड परिवार
न्यू प्रभात बेकर्स ॲण्ड फूड प्रॉडक्टस्
अहमदनगर.

# जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेला प्लॉट व त्या वरील बांधकामसह मिळकत विद्यमान मालक **रियाज हबीब बागवान रा. आलमगीर, अहमदनगर** यांचे मालकी वहिवाटीची असुन सदर मिळकत विक्री करण्याचा व्यवहार आमचे अशिलांबरोबर ठरवुन सदरची मिळकत कायमखुष खरेदी देण्यांचे ठरविले असून विसारापोटी रक्कम देखील स्वीकारलेली आहे. तसेच सदरची मिळकत निर्वेध, निजोखमी असल्या बाबत आमचे अशिलास विश्वास व भरोसा दिलेला आहे.

परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की सदर मिळकतीबाबत कोणतेही चालु वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षिसपत्र मनाईहुकुम, दावा कोर्ट कारवाई बँक बोजा सोसायटी राईटस अन्य वस्त्र लिज अथवा अगर कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास संबंधीताने ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **७ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर प्लॉट खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन** – जिल्हा तुकडी अहमदनगर पो. तु. ता. नगर पैकी अहमदनगर जिल्हा परिषद हद्दीतील मौजे **नागरदेवळे** येथील बिगरशेती प्लॉट व त्यावरील बांधकामासह मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

| स.नं. | प्लॉट नं. | चौ. मी. |
|---|---|---|
| २४२/१ | २३३ | १५९.५० |

हा संपुर्ण प्लॉट व त्यावरील मंजुर प्लॅन प्रमाणे आर सी सी स्ट्रकचर्स मध्ये बांधकाम झालेल्या स्किम पैकी युनिट नं. १ व युनिट नं. २ या संपुर्ण मिळकती बाबत.

**यांसी चतु:सिमा :**
पुर्वेस – ६ मीटर रस्ता
दक्षिणेस – प्लॉट नं. २३४
पश्चिमेस – प्लॉट नं. २२६
उत्तरेस – ६ मीटर रस्ता

**ॲड. नाजिम अहमद इस्माईल शेख**
**ॲड. कुरेशी फैजान फारुक**
जुन्या कलेक्टर ऑफीस जवळ, डावरेगल्ली, अहमदनगर
मो. ९८८१४३१८६० / ७२७६२५२४७८

दि.१७/१०/२०२४
अहमदनगर

।। कुलस्वामिनी प्रसन्न ।।
शेअरिंग कॅब डेली सर्व्हीस
नगर–पुणे–नगर
आता आपल्या शहरातुन
दररोज
नगर येथून स. ७,८,९ व दुपारी २.००
पुणे येथून स.११,१२,२ व सायं.५ वा
Ac Xccent / WegonR / Dzire
प्रत्येक वेळेस निरजंतुकीकरण
मर्यादित ३ सिट्स
पिकअप पॉईंट –भिस्तबाग चौक,झोपडी कॅन्टीन, तारकपूर,दिल्लीगेट, राज पॅलेस चौक,कायनेटिक चौक,केडगाव
पुणे ड्रॉप– वाघोली, खराडी बायपास,येरवडा, नवीन शिवाजीनगर बसस्टॅण्ड. बुकिंग आवश्यक
अमर–प्रेम हॉलिडेज्
ऑफिस– चितळेरोड,अ.नगर
9657746555/ 9226399555

# जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेल्या प्लॉटस् मिळकती विद्यमान मालक **आशादेवी कंवरलाल जैन, रा. राज चेंबर्स, कोठला स्टॅण्ड जवळ, अहमदनगर** यांच्या मालकी वहिवाटीच्या असुन सदर प्लॉटस् मिळकतीचा व्यवहार आमच्या अशिलाबरोबर ठरलेला असुन लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर प्लॉटस् मिळकती निर्वेध व निजोखमी आहे असे खरेदी देणाऱ्याचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही कोणताही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, **कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, खरेदीखत, साठेखत, करारनामा, मनाई, दावा, लिज, गहाण, दान, बक्षिस, पोटगी हक्क व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यास** त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाले पासून **७ (सात) दिवसाचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपूर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर प्लॉटस् मिळकती खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन** – जिल्हा अहमदनगर, पोटतुकडी व तालुका नगरपैकी, अहमदनगर जिल्हा परिषद हद्दीतील, **मौजे शेंडी येथील सर्व्हे नं. ५०६ पै. (संगणकीकृत ७/१२ उताऱ्याप्रमाणे सर्व्हे नं.५०६/१ व संगणकीकृत ७/१२ उताऱ्याप्रमाणे सर्व्हे नं.५०६/८)** मधील खालील वर्णनाचे बिगरशेती खुले प्लॉटस् –

| प्लॉट नं. | क्षेत्रफळ चौ.मी. | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १ | १९१.२५ | प्लॉट नं.८ | प्लॉट नं. २ | १२ मीटर रस्ता | ९ मीटर रस्ता |
| ८ | १८९.०० | ६ मीटर रस्ता | प्लॉट नं. ७ | प्लॉट नं. १ | ९ मीटर रस्ता |

येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक काही एक राखून न ठेविता.

दि.१७/१०/२०२४
अहमदनगर

**ॲड. तनवीर एम. शेख**
नोटरी पब्लिक (भारत सरकार)
गोविंदपुरा, अहमदनगर
मो.नं. ९२७०४६४६००

**ॲड. मोहसीन आय. शेख**
**ॲड. गुफरान एफ. मोमीन**
कस्तुरी प्लाझा, डावरे गल्ली, अहमदनगर
मो.नं. ८०८७७४२४२८, ९२०९५९७१५०